**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५२२/०२**

**श्री.सुरेश वासुदेराव पाटील**
**घर क्र.जूनी ठवरे कॉलोनी**
**जरीपटका पोष्ट, नागपूर ४४० ०१४. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुरेश वा.पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.०९.२००७ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने दि.१३.०३.२००७ रोजी दाखल केलेल्या व इतर वेळोवेळी सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची मागणी केली होती. कार्यालयातील उपलब्ध नोंदी पडताळून पहाता अपीलकाराचा दि.१३.०३.२००७ चा तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. अपीलकाराने माहितीच्या अधिकारात केलेल्या अर्जाचा विषय प्रत्यक्ष कोणत्या विभागाशी संबंधीत आहे हे स्पष्ट होत नसल्याने अर्ज दप्तरी दाखल करण्यात येत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास

कळविले. जन माहिती अधिका-यांनी माहिती / दस्तऐवज पुरविले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडेम दि.१८.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती मुख्य सचिव कार्यालयातील जन माहिती अधिका-यांच्या कक्षेबाहेरील आहे. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३०.१०.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने दि.१३.०३.२००७ रोजी सादर केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मुख्य सचिव कार्यालयातील माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात दि.१०.०९.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जासोबत तक्रारीची प्रत जोडलेली नव्हती. अपीलकाराची दि.१३.०३.२००७ तक्रार कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. यामुळे अपीलकाराच्या मागणीचा विषय अवगत होत नसल्याचे कारणास्तव असे अपीलकारास कळवून अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला. तक्रारी सोबत संपूर्ण दस्तऐवज जोडलेले पीटीशन दि.२२.०२.२००७ ला पंजीकृत पोष्टाने पाठविली. दि.१३.०३.२००७ ची तक्रार आवकनोंद गृह विभाग महाराष्ट्र शासन दि.३०.०३.२००७ ला प्राप्त झाले. दि.१३.०७.२००७ ची तक्रारीची प्रतिलीपी सामाजिक न्याय मंत्री, मुख्य सचिव यांचे मार्फत दि.१३.०७.२००७ ला पंजीकृत पोष्टाने जन माहिती अधिका-यांना सादर केले. वित्तिय अभावाने जन माहिती अधिका-यांना तक्रारीच्या प्रतिलीपी पुन्हा सलग्न करुन शकत नाही. अन्यायाचे निराकरण करण्याकरिता शासनाची भुमिका काय आहे याबाबत आवश्यक माहिती मागीतली होती. तक्रारीवरील कार्यवाहीबाबतचा अहवाल न दस्तऐवज पुरविण्यात यावे अशी अपीलकाराने दि.२४.१०.२००७ च्या पत्रान्वये मागणी केल्याचे दिसून येते. अपीलकाराची दि.१३.०३.२००७ ची तक्रार मुख्य सचिव कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून आली नाही. अपीलकाराने तक्रारीची दुसरी प्रत मुख्य सचिव कार्यालयास उपलब्ध करुन दिली नाही. यामुळे तक्रारीचा विषय समजू शकला नाही. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांना आवश्यकती कार्यवाही करता आली नाही. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय

अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १४.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

FILENAME \p C:\Documents and Settings\abc\My Documents\Mr.R.Tiwari\Orders\Marathi 2009\Marathi July, 2009.doc Kamlesh

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५२५/०२**

**श्री.सेवाकर के. दुपारे**
**प्लॉट नं.१८, स्मृती नगर,**
**म्हाडा कॉलनी, अमरावती रोड,**
**दत्तवाडी, नागपूर ४४० ०२३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक,**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक**
**शिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे १.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक**
**शिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे १. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सेवाकर के.दुपारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०१.२००८ रोजी अर्ज करुन, शिक्षण उप संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे उल्लघन करुन नियमबाहया व चुकीचे आदेश का निर्गमित केले. श्री.नारायण जोशी यांना पाठीशी घालून त्यांना दि.१९.१२.२००५ च्या आदेशान्वये वरिष्ठ वेतनश्रेणीवर व गट-अ संवर्गात पदोन्नती का दिली. श्री.नारायण जोशी आणि श्री.रमेश पवार यांनी सन १९९८-९९ या वर्षी नागपूर येथे डी.एड. च्या प्रवेश प्रक्रीयेत विविध अनियमितता केली.

यासाठी मा.न्यायालयाने शिक्षणाधिका-यांना दोषी ठरविले. यामुळे बाधीत विद्यार्थ्यांना प्रत्येकी रू.२०००/- भरपाई देण्याबाबत मा.न्यायालयाने आदेश दिले. पर्यायाने शासनाचे नुकसान झाले. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०७.०२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपीलकाराने कागदपत्राची मागणी केलेली नाही. प्रश्नोत्तर रुपात माहिती पुरविण्याचा अग्रह धरला आहे. अशा स्वरुपाची माहिती पुरविण्यात यावी अधिनियमात तरतुद नाही. यामुळे अपीलकाराने मागणी केलेली माहिती पुरविता येणार नाही असे नमुद करून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील फेटाळ्ले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करून सर्वश्री नारायण जोशी, राम पवार यांचे विरूध्द शासनस्तरावरून शिक्षेची कारवाई होणे आवश्यक असूनही संचालनालयाच्या स्तरावरुन का करण्यात आली. श्री.नारायण जोशी यांचेविरूध्द कारवाई प्रास्तावित असतांना त्यांना आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पदोन्नती का दिली अशी माहिती मागीतली होती. शासन पत्र क्र.विचौअ-१०९९/प्र.क्र१५२/प्र.शा-३, दि.१५.०३.२००१ नुसार दिलेल्या निर्देशाप्रमाणे संचालनालयाचे स्तरावर कार्यवाही करण्यात आली. शासनाचे दि.२१.०३.२००७ च्या पत्रातील मार्गदर्शनाप्रमाणे सर्वश्री रामराव पवार व नारायण जोशी यांचेवर ठपका ठेउन त्यांचेकडून शासनास झालेल्या नुकसानीच्या रक्कमेची वसूलीचे आदेश दिले आहेत. अशी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरून अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १४.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

FILENAME \p C:\Documents and Settings\abc\My Documents\Mr.R.Tiwari\Orders\Marathi 2009\Marathi July, 2009.doc Kamlesh

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८४९/०२**

**श्री.रामकृष्ण भिवाजी दुधे**
**मयुर कॉम्प्लेक्स, भाजी मंडई समोर,**
**औरंगपूरा, औरंगाबाद.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. रामकृष्ण दुधे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०२.२००९ सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.०६.२००७ रोजी अर्ज करून, खिर्डी प्रकरणाअंतर्गत विभागीय चौकशीतील विसंगत बाबी शासनाचे निदर्शनास आणून देण्यासाठी अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेले दस्तऐवज देण्यास विभागीय कृषी सह संचालक औरंगाबाद किंवा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी खुलताबाद हे सक्षम आहेत. शासनाने अपीलकारास प्रस्तावित केलेल्या शिक्षेच्या संदर्भात निवेदन करावयाचे असल्यास ते शासनास तात्काळ सादर करावे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३१.०८.२००७ च्या पत्रान्वये कळविले. तसेच अपीलकारा संबंधीत विभागीय चौकशीच्या अहवालाच्या झेरॉक्स प्रती दि.०५.१०.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास उपलब्ध करुन देण्यात आल्या.

चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०७.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर दि.०१.०९.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकारास शासनाकडे जी उपलब्ध कागदपत्रे आहेत त्याची अपीलकारास पहाणी करता येईल. त्यांनतर त्या कागदपत्राच्या त्यांना आवश्यक असलेल्या प्रती उपलब्ध करुन घेता येतील. यासाठी अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी प्रतिबंद केलेला नाही असे नमुद करुन प्रथम अपील खारीज केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन खिर्डी, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद या प्रकरणातील विसंगत बाबी संदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेली कागदपत्रे ही क्षेत्रीय स्तरावरच असल्याचे गृहीत धरुन, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास तसे दि.३१.०८.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकाराच्या प्रकरणात विभागीय चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवाल अवर सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रकरणाशी संबंधीत संपूर्ण मुळ अभिलेखासह दि.१८.०३.२००५ रोजी सादर करण्यात आला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक विशेष अधिकारी, विभागीय चौकशा, औरंगाबाद यांनी अपीलकारास दि.१७.०३.२००६ च्या पत्रान्वये कळविले. सदरबाब अपीलकाराने सुनावणीचेवेळी आयोगाच्या निदर्शनास आणली. यावरुन कार्यालयातील उपलब्ध कागदपत्राची शहानिशा न करता गृहीत धरुन अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.३१.०८.२००७ च्या पत्रान्वये दिशाभूल करणारी चुकीची माहिती दिली.

जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी विलंबाने दि.०५.१०.२००७ च्या पत्रान्वये विभागीय चौकशी अहवालाच्या छायाप्रती पुरविल्या असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली माहिती चुकीची व खोटी, दिशाभूल करणारी असल्याचा व्दितीय अपीलात, अपीलकाराने मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत नस्ती / कागदपत्र प्रथम निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून

संबंधित नस्ती / कागदपत्रे निरीक्षण करावे.  त्यांनतर अपीलकाराने निवडलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२२५/०२**

**डॉ.पी.पी.गौर**
**सहयोगी प्राध्यापक क्ष किरण,**
**क्वार्टर नं.४/२, टी.बी.वॉर्ड,**
**डॉक्टरर्स कॉलनी, गर्व्ह.मेडीकल कॉलेज,**
**नागपूर ४४४ ००३.** **.... तक्रारदार**

**<u>विरूध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक (पणन)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास विभाग मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार डॉ.पी.पी.गौर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर अपीलावर दि.१८.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयात Video Confernci‍ng रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार तसेच तक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मुंबई मंडळाने जानेवारी, २००६ मध्ये मंडळाच्या मुंबईतील विविध वसाहतीमध्ये असलेल्या सदनिकाच्या विक्रीसाठी जाहिरात दिली होती. तक्रारदाराने जाहिरातीस अनुसरून रू.३, १५, ०००/- अनामत रक्कमेच्या धनाकर्षासह अर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया येथे भरला होता. म्हाडाने सदर सदनिका वाटपाची सोडत मुंबई येथे दि.११.०७.२००६ रोजी काढली. बँकेत तक्रारदाराचा अर्ज सोडतीनंतर मंडळाकडे पाठविला. त्यामुळे मंडळास अर्ज सोडतीमध्ये घेता आला नाही. तसे गैरअर्जदाराने तक्रारदारास दि.२४.११.२००६ च्या पत्रान्वये कळवून तक्रारदाराचा रू.३, १५, ०००/- एवढया रक्कमेचा धनादेश तक्रारदाराकडे पाठविला असल्याचे गैरअर्जदाराने सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. धनादेश प्राप्त झाला नसल्याचे तक्रारदाराचे म्हणने आहे. श्री.गौर यांनी सदनिका देण्याची विनंती केलेली आहे. त्याबाबत

प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यावर लवकरच निर्णय घेण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील क्र.१२१९/०२ च्या सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले होते. राज्य माहिती आयोगाने तसे दि.०३.०८.२००७ रोजी आदेश पारित केले.

मंडळाकडून, जन माहिती अधिका-याकडून आद्याप कोणतेही ठोस पत्र, एक वर्षाहून अधिक कालावधी उलटून गेला तरी प्राप्त झाले नाही. तक्रारदारास मंडळामार्फत सदनिका वाटपाबाबत जन माहिती अधिका-यांनी काहीही कळविलेले नाही. त्यामुळे तक्रारदारांना मानसीक त्रास होतो आहे असे तक्रारीत नमुद केले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदारास मंडळामार्फत सदनिका वाटपासंबंधी केलेल्या कार्यवाहीच सद्यस्थित हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास कळवावे.

**आदेश**

सबब तक्रार निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८११/०२**

**श्री.उमेशचंद्र राधेश्याम गुप्ता**
**३४, दत्त मंदिर चौक, अमराई,**
**यवतमाळ ४४५ ००१. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**वाहतुक भवन, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक (वाहतुक)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**वाहतुक भवन, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. उमेशचंद्र गुप्ता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०२.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयात Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.०१.२००८ रोजी अर्ज करुन, जळगांव विभागातील अधिकारी व लिपीकवर्गीय कर्मचा-यांचे मनमानी कारभाराची दि.२४.०८.२००७ व दि.०४.१०.२००७ रोजी तक्रार केली. अधिकारी नसतांना श्री.श्रीकांत चौधरी (अपराध शाखा) जगळाव यांनी अपीलकाराची फसवणूक केली. श्री.चौधरी यांचेवर खातेनिहाय काय कारवाई केली. याबाबतच्या कारवाईच्या प्रतीची मागणी केली. लिपीकवर्गीय कर्मचा-यावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०६.०२.२००८ च्या पत्रानुसार माहिती दिली. अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१६.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर

अपीलावर सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकाराने मागीतलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ जळगांव यांनी दि.०६.०२.२००८ च्या पत्रानुसार अपीलकारास पुरविली असल्याचे नमुद करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन लिपीकवर्गीय कर्मचारी श्री.श्रीकांत चौधरी अपराध शाखा, जळगांव विभाग हे विभाग नियंत्रक म्हणून करिता सही करतात. तसेच विभागीय वाहतूक अधिकारी म्हणून ही सही करतात. त्यामुळे त्यांच्यावर "अपराध प्रकारची कारवाई करावी"अशी अपीलकाराची मागणी आहे. प्रत्यक्षात असा प्रकार नाही. श्री.श्रीकांत चौधरी, लिपीक यांनी कधीही करिता म्हणून विभाग नियंत्रक / विभागीय वाहतुक अधिकारी म्हणुन सही केलेली नाही. तसा प्रकार घडलेला नाही. त्यामुळे श्री.चौधरी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. याबाबत अपीलकारास दि.०६.०२.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली आहे. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी वर नमुद केल्यानुसार दि.१६.०२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास लेखी अहवाल सादर केला आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४३३/०२**

**श्री.खान इसरार अहमद**
**९५/९७०, रफीनगर, शिवाजी नगर,**
**गोवंडी, मुंबई ४०० ०४३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**(एम/पुर्व) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी**
**(एम/पुर्व) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. खान इसरार अहमद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करून, अनधिकृत झोपडी तथा झोपडीदादांच्या विरूध्द शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उचिवत कारवाई करण्याची तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पत्र क्र.सह.आ/एम-पूर्व /७२०२७९१९०/ववअ, दि.०६.०६.२००८ रोजी आवश्यकत्या पुराव्याची प्रतीसह माहिती देण्यात आली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२५.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०६.०८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते. म्हणून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, अपीलकारास, जन माहिती अधिका-यांने दिलेल्या उत्तराचे समर्थन करून

दि.०७.०८.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउप अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मूलन व पुनर्वसन अधिनियम, १९७१ अन्वये संबंधीत श्री.मेराज महमद अन्वर अन्सारी यांच्यावर नोटीस बजाउन त्याच कायद्याच्या कलम ३ झेड-२ (६) नुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यास दि.१६.०५.२००८ रोजी कळविले. शिवाजीनगर पोलीस ठाणे गोवंडी यांच्याकडे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर अनधिकृत बांधकामाचे निष्कासन दि.२४.११.२००८ रोजी करण्यात आले. अर्धेअधिक बांधकाम तोडल्यानंतर तेथील काही समाजविघातक व्यक्तींनी कारवाईस विरोध दर्शविला. पोलीस सूचनानुसार पुढील कारवाई थांबविण्यात आली. तदनंतर सदर अनधीकृत बांधकामाविरूध्द असे पोलीसामार्फत जागेवर सुचित करण्यात आले. अपीलकारास सदर प्रकरणी वेळोवेळी माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०१.२००९ रोजी लेखी अहवाल सदर करुन आयोगास कळविले आहे. याच प्रकरणी अपीलकाराने आयोगाकडे अपील क्र.१६०८ व क्र.३७९३ दाखल केले होते. यावरुन एकाच विषयावर अपीलकाराने पुन्हा आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी केलेल्या कारवाईचा अहवाल दि.१२.०१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला आहे. यावरुन अनधिकृत बांधकामविरूध्द जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-याकडून केली असल्याचे / करत असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५४६/०२**

**श्री.जयवंत मधुकर मिश्रा**
**फ्लॅट नं.१६, जवाहर कॉलनी,**
**मु.पो.पुलगांव, ता.देवळी, जि.वर्धा. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. जयवंत मधुकर मिश्रा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.०७.२००७ रोजी अर्ज करुन, ईशा इंडियन गॅस एजंन्सीला गॅस एजंन्सी व गोडाउनचे बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांची सादर केलेल्या संपूर्ण दस्तऐवजाच्या प्रतिलिपी व लेखा माहिती मिळणेबाबत मागणी केले होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०३.२००९ च्या पत्रानुसार एकूण २६ मुद्याबाबत मुध्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. मागणी केलेले दस्तऐवज मिळाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२३.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील दि.१८.१०.२००८ रोजी आदेश पारित करुन निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन ईशा गॅस एजंन्सीबाबत एक २५ मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झाले नाही. अपीलकाराने मागणी केलेली माहिती जिल्हा न्यायदंडाधिकारी कार्यालय, धुळे यांच्या अधिकार क्षेत्राशी संबंधीत असल्याने सदर कार्यालयाकडून माहिती मिळण्याची अपीलकाराची अपेक्षा आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १४.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५५२/०२**

**श्री.जयवंत मधुकर मिश्रा**
**फ्लॅट नं.१६, जवाहर कॉलनी,**
**मु.पो.पुलगांव, ता.देवळी, जि.वर्धा. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. जयवंत मधुकर मिश्रा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०३.०१.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

श्री.रामधन किसन पवार शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद शिक्षण विभाग, वर्धा यांची नियुक्तीचे वेळी १) शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता कोणती? २) श्री.रामधन किसन पवार चे शैक्षणिक व व्यवसायिक प्रमाण पत्राची सत्य झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.१४.०२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. दस्तऐवज मिळाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे

दि.०७.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.०३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली संबंधीत नस्ती/कागदपत्र अपीलकारास प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन दिली. श्री.रामधन किसन पवार यांच्या शैक्षणिक व व्यवसायीक पात्रतेच्या प्रती कार्यालयातील संबंधीत नस्तीमध्ये नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाहीत. श्री.पवार यांच्या नियुक्तीनंतर त्यांच्या शैक्षणिक व व्यवसायिक पात्रतेत काही बदल झाला असल्यास त्याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तकावरुन उपलब्ध होउ शकत असल्याने त्याकरिता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडे संपर्क साधण्याबाबत अपीलकारास कळविण्यात आले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन श्री.रामधन किसन पवार यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विलंबाने चुकीची माहिती दिली. प्रथम अपिलाच्या सुनावणीत अपीलकाराचे ऐकले नाही व मान्य केले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. श्री.रामधन किसन पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वर्धा यांच्या महाराष्ट्र लोकसेवा आयेगाकडून शिफारस होउन महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग-१ (प्रशासन शाखा) मध्ये नियुक्ती झाली. त्यांनी लोकसेवा आयोगाकडे दि.२५.१०.१९९४ रोजी भरुन दिलेल्या अर्जाची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली आहे. श्री.पावर हे एम.ए.बी.एड. शैक्षणिक पात्रता धारण करतात. एच.डी.एड ची समकक्षता राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडून निश्चीत केली जाते असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६६२/०२**

**श्री.इंद्रजित चिंतामणराव शिंदे**
**७४, मातृछाया अशोकनगर,**
**नांदेड ४३१ ६०५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त संचालक,**
**उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक,**
**उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. इंद्रजित चि.शिंदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०७.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.आय.सी.शिंदे, उद्योग निरीक्षक, नांदेड यांचे बदलीस कारणीभूत ठरलेल्या कोणत्या व्यक्तीची / संघटनेची राजकीय पुढा-याची तक्रार आहे. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे श्री.आय.सी.शिंदे, उद्योग निरीक्षक यांचेबाबत एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती आधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलकारास माहिती पुरविली. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यास प्रमाणाबाहेर विलंब झाला. अपीलकारास माहिती पुरविण्यास प्रमाणाबाहेर झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२३४/०२**

**श्री.दिपक रमेश बारापात्रे,**
**अशरफी नगर, ताकिया वॉर्ड, भंडारा. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक,**
**वैद्यमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.दिपक बारापात्रे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.११.२००७ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२०.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात दि.१२.०२.२००७ रोजी अर्ज करुन नियंत्रक, वैद्य मापन शास्त्र (म.रा.) मुंबई यांनी सहाय्यक अधिक्षक संवर्गातून शिरस्तेदार पदावर पदोन्नती देतांना अनेक सेवाजेष्ठ (वरिष्ठ) कर्मचा-यांना डावलून कनिष्ठ कर्मचा-यांना पदोन्नती दिल्याबाबत अनुषंगीक एकूण १५ मुद्यावर माहिती मागीतली होती. गैरतक्रारदारानी अपीलकारास दि.२८.०२.२००७ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. माहितीच्या अधिकारात उपलब्ध आदेशाच्या प्रती पुरविल्या जातात, कोणत्याही मुद्यांचे प्रश्न उत्तराच्या स्वरुपात उत्तर देणे अपेक्षित नाही असेही कळविले. नियंत्रक वैद्य मापन शास्त्र कार्यालयातील गैरतक्रादार यांनी क्र.वैमाशा/मा.अ./१०२/दिरबा/०७/३८७८, दि.२२.०३.२००७ अन्वये माहिती मागीतली होती. पुन्हा दि.२०.१०.२००७ च्या पत्रासोबत माहिती प्रत पुरविली.

नियंत्रक, वैद्य मापन शास्त्र यांच्या आस्थापनेवर ग्राहक मंचासाठी निर्माण केलेल्या १५७ पदाबाबत अनुषंगीक माहिती अपीलकाराने मागीतली आहे. सदर पदे राज्य आयोगाच्या शिफारशीने शासनस्तरावरुन निर्माण केलेली आहेत. सदर पदांना सचिव उच्चधिकार समितीने मान्यता दिलेली

असल्याने ग्राहक मंचातील नविन पदे कोणत्या परिस्थितीत निर्माण झालेली आहेत.  याबाबतची माहिती राज्य आयोगाच्या माहिती अधिका-याकडून घेण्यात यावी.  मार्गदर्शक तत्वे याबाबतची माहिती कार्यकारी सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्याकडून घेण्यात यावी.  दि.१४ मार्च, २००६ पूर्वी शिरस्तेदार हे पद नियंत्रक, वैद्य मापन शास्त्र या आस्थापनेवर नसल्याने त्यावर पदोन्नती देण्यात आलेली नाही.  १५७ पदे ही राज्य आयोग व ग्राहक मंच कार्यालयासाठी निर्माण करण्यात आलेली असल्याने त्यांचे कर्तप्य व जाबाबदा-या राज्य आयोगाच्या गैरतक्रारदाराकडून उपलब्ध करुन घ्याव्यात असे गैरतक्रारदार, नियंत्रक, वैद्य मापन शास्त्र यांनी दि.२२.०३.२००७ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले.  यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

शासनस्तरावरुन १५७ नवीन पदे निर्माण केली आहेत.  त्यापैकी शिरस्तेदाराची ३५ पदे आहेत. शिरेस्तदाराची पदे सहाय्यक अधिक्षक संवर्गातून पदोन्नतीने दि.१४.०३.२००७ रोजी भरण्यात आली.  सदर पदोन्नती देतांना सहाय्यक अधिक्षक संवर्गातील अनेक सेवाजेष्ठ कर्मचा-यांना डावलून कनिष्ठ कर्मचा-यांना पदोन्नती दिली.  शिरस्तेदार ही पदे नव्याने निर्माण केली आहेत.  सदर पदाच्या प्रस्तावित सेवा प्रवेश नियमास शासनाने मंजूरी दिलेली नाही.  सदर प्रस्तावित सेवा प्रवेश नियमास अनुसरुन केवळ पदवीधर कर्मचा-यांनाच पदोन्नती दिली.  यामुळे अनेक सेवाजेष्ठ कर्मचा-यावर अन्याय झाला असल्याचा मुध्दा तक्रारदाराने दि.१२.११.२००७ च्या तक्रारीवर उपस्थित केला आहे.  यावरुन असे दिसून येते की, नियंत्रक वैद्य मापन शास्त्र यांच्या आस्थापनेवर नव्याने निर्माण केलेल्या १५७ पदाबाबत अपीलकाराने मागीतलेली माहिती अपीलकारास प्राप्त झाली आहे.  पदवीधर कर्मचा-यांनाच शिरस्तेदान पदावर पदोन्नती देण्यात आली असल्याचा मुध्दा शिल्लक राहतो.  सदरबाब उक्त अधिनियमात मोडत नाही.  याकरिता अपीलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब तक्रार निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक १६.०७.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६६७/०२**

**श्री.शेख निसारअहमद तांबोळी**
**३५-ब, अनम पॅलेस, अविष्कार कॉलनी,**
**चाळीसगांव रोड, धुळे ४२४ ००१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. शेख निसार अहमद तांबोळी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०७.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०२.२००७ रोजी अर्ज करुन केंद्रशासन पुरस्कृत सधन प्रक्षेत्र व मदरसाचे अधुनिकीकरण योजनेबाबत एकूण १४ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतीली होती. अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.१, २, ३, ५, ६, १४ व सधन प्रक्षेत्र अंतर्गत कोणकोणत्या तारखेला केंद्रशासनाकडून राज्य शासनाला किती अनुदान मिळाले. याबाबतची माहिती राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई यांचेशी संबंधीत असल्याने त्यांच्याकडे संपर्क साधावा. अ.क्र.९ बाबतच्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडे संपर्क साधावा. अ.क्र.४, ७, ८, १२ व १३ बाबतच्या माहितीसाठी रू.५०/- शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल. अ.क्र.११ बाबत नमुद करण्यात येत की, तो ये-जा नोंदक्रमांक असतो. त्यामुळे त्याची प्रत पाठविण्याचा संबंध येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.०५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.०६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आदेश पारित केले नाहीत. म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन, केंद्र शासन पुरस्कृत, सधन प्रक्षेत्र व मदरसाचे आधुनिकीकरणावर एकूण १४ मुद्यांबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१८.०६.२००७ च्या पत्रान्वये अर्जातील मुध्दा क्र.१, २, ५, १४ बाबत माहिती पुरविली. प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकारास दोन कागदपत्र उपलब्ध करुन दिली. उर्वरित कागदपत्र शोध घेउनही उपलब्ध झाली नसल्याने अपीलकारास कळविले. व्दितीय अपीलाच्यावेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी अहवाल सादर करुन असे प्रतिपादन केले की, अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.९ ते १३ येथील माहिती अपीलकारास आठ दिवसाचे आत पुरविण्यात येईल. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी कबूल केल्यानुसार अपीलकारास ९ ते १३ मुद्याबाबत १५ दिवसाचे आत माहिती द्यावी.

**आदेश**

अपील अशंत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २०.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६८८/०२**

**श्री.कैलास पुंजाराम सरग**
**मु.पो.मेहुणे, ता.मालेगांव,**
**जि.नाशिक ४२३ २०३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**न्यु इंग्लीश स्कुल खादगाव,**
**ता.नांदगाव, जि.नाशिक.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. कैलास पुंजाराम सरग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०९.२००८ रोजी अर्ज करुन इयत्ता ८ वी (अ) चे वार्षिक निकालपत्रकाचे वार्षिक तपासणीबद्दल दि.०१ मे, १९९८ ते माहिती पुरावीपर्यंतच्या कालावधीची माहिती दि.०१.०५.२००८ पासून न्यु इंग्लीश स्कुल खादगाव, ता.नांदगाव, जि.नाशिक या शाळेची वार्षिक तपासणी किती वेळेस झाली किंवा नाही इत्यादी अनुषंगीक मुद्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी,

औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०३.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, न्यु इंग्लीश स्कुल खादगांव, ता.नांदगांव, जि.नाशिक या शाळेच्या दि.०१.०५.१९९८ ते माहिती पुरवी पर्यंतच्या कालावधीत झालेल्या वार्षिक तपासणी अहवालाच्या प्रतीची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकाराने मागणी केलेली माहिती दिली असल्याचे आयोगास जन माहिती अधिका-यांनी दि.०२.०६.२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर माहितीचे अवलोकन केले असता अर्जातील मुध्दा क्र.१ व २ ची माहिती पुरविली आहे. अर्जातील मुध्दा क्र.३ वार्षिक तपासणीमध्ये वार्षिक निकालपत्राची तपासणी संबंधीत अधिका-याकडून केली जाते का? असल्यास/नसल्यास याबाबत माहिती मागीतली. मुध्दा क्र.४ शिक्षण खात्याच्या अधिका-यांनी वार्षिक निकालपत्रावर सही, शिक्का, दिनांक व शेरा दिलेला असेल त्या प्रतीची मागणी केली होती. तपासणी केली नसेल तसे तशी माहिती मागीतली होती. प्रश्न वजा खुलासा मागीतला असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. अपीलकाराने मागणी केलेल्या मुद्याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती देणे केव्हाही उचित राहील. अशी माहिती न देण्यासाठी अधिनियमातील

कलमाचा आधार घेणे योग्य नाही. एस.एस.कोड अनुसार वार्षिक तपासणीचा अहवाल दीर्घकाळ जतन करावयाचा असल्यास इयत्ता ८ वी (अ) चे निकालपत्रक शोधूनही सापडत नाही. बारावर्षापूर्वीचा असल्याने शोध लागत नाही. सापडल्यास त्वरीत देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उत्तर दिले आहे. याप्रकरणी आयेगाने गांभीर्यपुर्वक लक्ष द्यावे भाषेची तपासणी करावी अशा दि.२८.०५.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सूचना केल्या आहेत. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.३, ४, व ५ बाबत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २०.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६९३/०२**

**श्री.पोपट महादेव पाटोळे**
**मु.पो.टाकळीवे, ता.जि.उस्मानाबाद . .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळ,**
**१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळ,**
**१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. पोपट महादेव पाटोळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०८.२००८ रोजी अर्ज करुन, बलुत्तेदार, कारागीर, रोजगार हमी योजनेतंर्गत मंजूर पदे, पदनिहाय मंजूर पदाची संख्या, बी.एल.व्ही.अे. जिल्हानिहाय सचिव, सहाय्यक यांची पद संख्या, संस्थेचे कर्ज वाटप, वसूली व सचिव, सह सचिव यांचे दरमहा पगार, के.व्ही.आय.बी.चे कर्मचारी, जिल्हानिहाय वेतन, प्रवास बिले, एम.एम.सी.बी.एस. इतर योजनेचे कर्ज वाटप व वसूल, मंडळाची उपलब्ध मालमत्ता सविस्तर ठीकाणासह यात उपयोगात, अतिक्रमीत, विनावापर सह सविस्तर माहिती मंडळाच्या मालमत्तेच्या तपशिलाची यादी, मंडळाचे उपलब्ध अंबर चरख्यांची जिल्हा निहाय यादी इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०३.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित

नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.०४.०८.२००८ रोजी अर्ज करुन, वरील परिच्छेद १ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने दि.२८.११.२००८ च्या पत्रान्वये एकूण ६ मुद्यावर मुध्दे निहाय्य माहिती अपीलकारास पुरविली. यावरुन असे दिसून येते की, अपीलकारास आवश्यकती माहिती विलंबाने पुरविण्यात आली आहे. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे. या परिस्थितीत मी आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २०.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६६८/०२**

**श्री.दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल**
**रा.बादेवड, मेनरोड, जि.जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**ग्राम विकास व जलंसधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**ग्राम विकास व जलंसधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिलीपकुमार अग्रवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०६.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.११.२००६ रोजी अर्ज करुन, ग्रामपंचायत व जिल्हा परिषद जळगांव जिल्हयाची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे अमंलबजावणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२९.०२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अमंलबजावणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली

होती.  जन माहिती अधिका-याने अपीलकारास माहिती पुरविली आहे.  यावर अधिक खुलासा करावा अशी अपीलकाराची मागणी आहे.  अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप फार मोठे असल्याचे दिसते.  यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २१.०७.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६८५/०२**

**श्री.एम.आर.शेख**
**प्रमाणित लेखा परिक्षक,**
**सहकारी संस्था, ता.राहुरी,**
**जि.अहमदनगर, राहुरी ४१३ ७०५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. एम.आर.शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०६.२००८ रोजी अर्ज करुन, सहकार खात्यातील प्रलंबीत तक्रारीबाबत अनुषंगीक ३ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. १) नाशिक विभागातील सन २००८-११ सनदी/प्रमाणित लेखापरिक्षक नाम तालीका उल्लघनाबाबत २) अहमदनगर जिल्हयातील पूर्णवेळ नोकरीस असलेले (पदुम) संस्थेचे प्रमाणित लेखापरिक्षक कमी करणेबाबत ३) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकारी, अपील निकाली काढत नसल्याबाबत अशा प्रलंबित तक्रारीवर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.१६.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०९.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशानुसार संबंधीत अधिकारी माहिती देत नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर

अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०३.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, परिच्छेद १ मध्ये नमुद केलेल्या ३ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी दि.२२.०९.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास सविस्तर माहिती पुरविली. अपीलकाराने प्राप्त माहिती मध्ये काही त्रुटी असल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबतही जन माहिती अधिका-यांनी खुलासा केला. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी आवश्यकती कार्यवाही केली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २१.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६५९/०२**

**श्री. प्रल्हाद गोविंदराव रावले**
**मु.सातेफळ, पो.हयातनगर,**
**ता.बसमतनगर, जि.हिंगोली. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रल्हाद रावले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०५.२००७ रोजी अर्ज करुन, अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबत मागणी केली होती. अपीलकार यांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार सेवेतून कमी करणे व निर्वाहभत्ता मंजूर करणेबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी, हिंगोली हे सक्षम असल्याने त्यांच्याशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.०७.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.११.१०.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०१.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबत मागणी केली होती. अपीलकार श्री.प्रल्हाद गोविंद रावले हे तलाठी पदावर कार्यरत असतांना त्यांनी सरकारी रक्कमेचा अपहार केल्यामुळे बसमत जिल्हा हिंगोली कोर्टात गुन्हा दाखल होता. कोर्टाच्या दि.०४.०४.१९६८ च्या निकालानुसार अपीलकारास रु.५०/- दंड व एक कोर्ट उठेपर्यंत शिक्षा झाली. त्यानुसार अपीलकारांना दि.०४.०८.१९६७ ते दि.३०.१०.१९७७ या कालावधीत निलंबित करण्यात आले. तद्‌नंतर उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.३०.११.२००७ च्या आदेशानुसार अपीलकार यांना तलाठी पदावरुन कमी केले. त्यांना निलंबन कालावधी १० वर्षे २ महिने २८ दिवस इतका होता. त्यांना निलंबन कालावधीतील १ रुपया दराने निर्वाह भत्ता देण्यात आला. महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ३० अनुसार किमान अर्हताकारी सेवा १० वर्षापेक्षा कमी होत असल्यामुळे त्यांना सेवानिवृत्तीवेतन अनुज्ञेय नाही. अपीलकार यांनी केलेली सेवा विचारात घेउन त्यांना अनुकंपा निवृत्ती वेतन मंजूर करण्याबाबत त्यांनी केलेली विनंती अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबत खास विचार करण्यायोग्य समर्थनीय खुलासा न केल्यामुळे त्यांची अनुकंपा निवृत्ती वेतन मिळण्याची विनंती शासनाने अमान्य केली. त्याप्रमाणे अपीलकारास कळविण्यात आले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २१.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७०३/०२**

**श्री. अनिल आदिनाथ मुके**
**व्दारा. डॉ.सरदारखान यांचे घर,**
**समर्थनगर, उस्मानाबाद.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता,**
**लघु पाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ,**
**औरंगाबाद.**

**जन माहिती अधिकारी,**
**स्थानिक लघुपाटबंधारे विभाग,**
**औरंगाबाद.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अनिल मुके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये दि.०४.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२७.०८.२००७ रोजी अर्ज करुन स्थानिक स्तर लघू पाटबंधारे विभाग, औरंगाबाद मार्फत बंधा-याची व गेटदुरुस्तीची कामे विहित मुदतीत करुन सुध्दा त्याच्या बीलासंबंधी आद्यापर्यंत निधी का आला नाही त्याची लेखी कारणे व इतर अनुषंगीक मुद्याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१८.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने विविध प्रश्न व त्यावर करावयाची कार्यवाही याची माहिती मागीतली. शासनाच्या अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती कागदपत्राच्या प्रतीच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षीत आहे. सदर

बाबी लक्षात घेउन अपीलकाराने मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम ८(क) अनुसार नाकारण्यात आल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१३.११.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे व्यथित होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

लघु पाटबंधारे विभागांतर्गत केलेल्या कामाची कंत्राटीदाराची बीले आदा केलेली नाहीत. यामुळे अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी दि.१३.११.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास समर्पक माहिती दिली आहे. या परिस्थिती मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २४.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/३१२ व ३१३/०२**

**श्री.शशिकांत रामचंद्र पाटील,**
**म्युन्सि चाळ, ४५ के.एफ.खोली क्र.३,**
**लालबाग मासळी मार्केट,**
**श्री गणेश नगर, मुंबई ४०० ०१२.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग,**
**डॉ.बी.ए.रोड, परळ नाका, परेल, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.शशिकांत पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०१.२००९ व दि.१९.०३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार तसेच तक्रारदार हजर होते. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन श्री.मारुती नारायण जाधव (मनपा भाडेकरू) यांच्या खोली क्र.२ मध्ये पोटभाडेकरू ठेवला असून त्याचा त्रास होत असल्याचे निवेदन तक्रारदार श्री.शशिकांत पाटील यांनी लोकशाही दिनी बृहन्मुंबई महानगरपालिकेत दि.०१.०३.२००४ रोजी सादर केले होते. त्याची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. याबाबतचा जुना पत्रव्यवहार कार्यालयात उपलब्ध नसल्याने माहिती नाकारली होती. जुना पत्रव्यवहार का उपलब्ध होत नाही याबाबत तक्रारदाराने खुलासा मागीतला होता. याबाबत गैरतक्रारदाराने माहिती दिली नाही. म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील क्र.२००८/१३३३/०२ दाखल केले होते. सदर अपीलावर सुनावणी आयेजित करण्यात आली होती. "गैरतक्रारदाराने संबंधीत कागदपत्राचा पुन्हा जाणिवपूर्वक शोध घ्यावा. त्यानंतर संबंधीत कागदपत्र सापडली नाही तर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जाणिवपूर्वक निर्णय घेउन तक्रारदारास वस्तुस्थिती १५ दिवसाचे आत कळवावी" असे दि.१८.१२.२००८ रोजी आदेश

पारित केले होते.  त्यानंतरही विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

दि.१८.१२.२००८ च्या आयोगाच्या आदेशात निर्देशित केल्याप्रमाणे चौकशी अधिका-याकडून श्री.मारुती नारायण जाधव आणि सोनाबाई कदम यांच्याविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिका कलम १०५ ब अन्वये दाखल केलेली चौकशी क्र.४/एफ/द/२०४ बाबतचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती व चौकशी बंद करण्याबाबतचे चौकशी अधिकारी (विधी) यांचे आदेश याच्या छायाप्रती दि.०७.०१.२००९ च्या पत्रानुसार तक्रारदारास, गैरतक्रारदाराने पुरविल्या असल्याचे तक्रारीतील कागदपत्रावरुन दिसून येते.  यावरुन राज्य माहिती आयोगाच्या दि.१८.१२.२००८ च्या आदेशाचे अनुपालन झालेले दिसते.  या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब तक्रार निकली काढण्यात येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २४.०७.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८४५/०२**

**श्रीमती. रमीला ए. पटेल**
**बी-१७, गुजराती सोसायटी,**
**नेहरू रोड, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
**सहकारी संस्था (३), मुंबई गृहनिर्माण भवन,**
**रूम नं.६९, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, के - पूर्व विभाग मुंबई यांचे कार्यालय,**
**मल्होत्रा हाउस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.रमीला ए. पटेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०८.२००८ रोजी अर्ज करुन, दुकान क्रमांक ५ आणि ६ गुजराती सोसायटी, नेहरू रोड, विलेपार्ले (पू) मुंबई येथील आवर ओन कंझ्युमर को-ऑप स्टोअर्स लिमिटेड बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संस्थेशी संबंधीत असून संस्थेवर कार्यरत प्रशासन मंडळ यांच्याकडे मागणी करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकार यांना माहिती उपलब्ध करुन देणेबाबत, संस्थेवर कार्यरत असलेल्या प्रशासक मंडळाला कळविण्यात आले असल्याचे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, प्रथम अपील फेटाळण्यात येत असल्याचे दि.२२.०१.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१३.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, गुजराती को-ऑप.मंडळ विलेपार्ले (पू) मुंबई बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. कंझुमर सोसायटी केव्हा नोंदणीकृत झाली. भागधारकांची संस्था, सभासदाच्या नावाची यादी. दुकानाचे भाडे कोण भरते. उत्पन्न व खर्चाचे ताळेबंदाची प्रत, कार्यवृतपुस्तीकेची प्रत. सदर गेल्या १० वर्षातील माहिती. शेवटची निवडणूक केव्हा झाली, निवडूण आलेल्या समितीच्या सभासदांची नावे संस्थेची अद्यावत स्थिती याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मुंबई यांनी दि.३०.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना असे कळविले की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही संस्थेशी संबंधीत असून संस्थेवर प्रशासक मंडळ कार्यरत आहे. त्यामुळे त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपीलकार यांना माहिती, संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देणेबाबत प्रशासन मंडळ यांना जन माहिती अधिका-यांनी कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. अपीलकार व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थिती मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २४.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/२८८१/०२

श्री.शम्मू शरण सक्सेना
मुंबई साथी, हिंदी (सा.) समाचार पत्र,
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
रे-रोड स्टेशन समोर, माझगांव,
मुंबई ४०० ०१०. .... अपीलकार

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग, चेंबूर (पू), मुंबई ४०० ०७१.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी (एम.विभाग)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग, चेंबूर (पू), मुंबई ४०० ०७१. .... उत्तरवादी

विवेचन

अपीलकार श्री.शम्मू शरण सक्सेना यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, जन माहिती अधिका-याच्या कार्यक्षेत्रात/ विभागांतर्गत गोवंडी, शिवाजीनगर, बैगनवाडी, कमला रामण नगर, गौत्तम, रफीक नगर, गोवंडी ते चेंबूर या क्षेत्रात किती खाजगी नर्सींग होम/डीसपेंसरी आहेत. त्यापैकी किती नोंदणीकृत प्रशिक्षीत डॉक्टर/नर्स आहेत. किती अप्रशिक्षीत नर्स आहेत. किती बेड आहेत. फॅमीली नर्सिंग होम भरत नगर चे रजीस्ट्रेशन आहे का? इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.०१.०१.२००९ व ०६.०३.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. नर्सिंग होमची फाईल पहाण्यासाठी अपीलकारास कार्यालयात बोलावले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.०२.२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, गोवंडी ते चेंबूर परिसरातील खाजगी नर्सिंग होम / डीसपेंसरीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती अपीलकारास दि.०१.०१.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. तसेच नर्सिंग होम संबंधीची फाईल पहाण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत अपीलकारास कळविले. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे व्यापक स्वरुप लक्षात घेता संबंधीत फाईलच्या निरीक्षणाकरिता अपीलकारास कार्यालयात पूर्व परवानगीने उपस्थित राहण्याबाबत कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सहकार्य करण्याची पूर्णपणे तयारी दर्शविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरु दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८९७/०२**

**श्री.अफजल शेख**
**बी-४, यश गौरब हो.सो.नं.११५,**
**म्हाडा गेट. नं. ४, मालवणी, मालाड (प),**
**मुंबई ४०० ०९५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अफजल शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०१.२००९ रोजी अर्ज करून, मालाड (प) येथील द मॉल या शॉपींग सेंटरच्या बांधकामाबाबत करण्यात आलेल्या तक्रारपत्रावर विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत एकूण ५ मुद्याबाबत माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१४.०१.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती देउन दिशाभूल केल्याच्या कारणावरुन दि.२८.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशानुसार विसंगत उत्तर पाठविले असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिकरी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मालाड (प) येथील द मॉलच्या बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर विषयासंदर्भात महानगरपालिका अधिनियम कलम ३५४ अ अन्वये कार्यवाही केली. सदर अनधिकृत बांधकाम २-३ वेळा निष्काषीत करण्यात आले होते. पक्षकाराने सदर नोटीसी विरुध्द मा.उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे सदर प्रकरणी सद्या न्यायप्रविष्ठ आहे. उक्त सी सुट क्र.३८/०९ व एल सी सुट क्र.५५५/०९ अन्वये प्रलंबित आहे. पुढील कारवाई मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात येईल असा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८७८/०२**

**श्री.जागृती जे.वसा**
**ई/६१, गुजराथी सोसा,**
**नेहरू रोड, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
**को.ऑप.सोसा, ६९, म्हाडा बिल्डींग, काला नगर,**
**बांद्रा (प), मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासक**
**सोसायटी बोर्ड, श्री विलेपार्ले गुजराती मंडळ,**
**को.ऑ.हो.सोसा, नेहरू रोड, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जागृती जे.वसा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.११.२००८ रोजी अर्ज करुन, गुजराती मंडळ सहकारी गृहनिर्माण संस्था लि.नेहरू रोड विलेपार्ले (पू) मुंबई येथील ६० सभासदांची प्रलंबीत रक्कमेसह यादी सूचना फलकावर लावली. सदर सभासदाविरुध्द काय कारवाई करण्यात आली. प्रलंबित रक्कम वसूल केली का? सदर सभासदाविरुध्द कोणत्या कारणावरुन काही कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे काय? सदर यादी अंतीम आहे काय? रक्कम प्रलंबित असलेले आणखी काही सभासद आहेत काय? इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, गुजराती मंडळ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ६० सभासदाकडे संस्थेची रक्कम प्रलंबित असल्याची यादी सूचना फलकावर लावली होती. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. संस्थेने बायलॉज प्रमाणे सभासदाविरुध्द रक्कमेची आकारणी केली आहे. या संदर्भात संबंधीतबाबीचे दर आकारणीबाबतची यादी अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी पुरवावी. जन माहिती अधिका-यांनी सदर कार्यवाही हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६६६/०२**

**श्री.शेख निसारअहमद शेरमंहमद तांबोळी**
**३५, अविष्कार कॉलनी, ४० गांव रोड, धुळे ४२४ ००१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव**
**मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शेख निसारअहमद शेरमंहमद तांबोळी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०८.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे दि.१९.०७.२००७ रोजी अर्ज करून दि.१६.०५.२००७ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात झालेल्या कार्यवाही संदर्भात दस्तऐवजाची साक्षांकित छायाप्रतीची मागणी केली होती. अपीलकाराचा दि.१६.०५.२००७ चा तक्रार अर्ज दि.२१.०५.२००७ रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांचेकडे पाठविला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.०७.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.३१.०७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.०८.२००७ आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.१६.०५.२००७ रोजीच्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विषयासंबंधीची असल्याने जन माहिती अधिकारी-यांनी अपीलकाराचा अर्ज त्या विभागाकडे हस्तांतरित केला. या बाबत अपीलकारास अवगत करण्यात आले. मुख्य सचिवांच्या कार्यालयातील माहिती अधिका-याकडूनच, माहिती उपलब्ध झाली पाहिजे ही अपीलकाराची मागणी कायदेशीर तरतुदीशी सुसंगत नाही असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलका-यांनी आदेश पारित केले आहेत. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जावर समर्पक नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २४.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६७६/०२**

**श्री.इकबाल अहमद महंमद नझीर**
**८००/५० किल्लर रविवार वॉर्ड,**
**मालेगांव, जि.नाशिक. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आयुर्वेद संचालनालय,**
**खन्ना कन्स्ट्रक्शन हाउस,**
**२ रा मजला, डॉ.आर.जी.धडानी मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**आयुर्वेद संचालनालय,**
**खन्ना कन्स्ट्रक्शन हाउस,**
**२ रा मजला, डॉ.आर.जी.धडानी मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. इकबाल अहमद महंमद नाझीर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन, मोहम्मदीया तीब्बीया युनानी कॉलेज आणि असायर हॉस्पीटल (एम.टी.सी. आणि अेएच) मनसुरा, मालेगांव, जि.नाशिक येथील सन २२६-२००७ मधील प्रवेश प्रक्रीयेबाबत, संचालक, डी.एम.ई.आर, मुंबई यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.१०.२००७

च्या पत्रान्वये माहिती दिली.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले.  सुनावणीकरिता अपीलकार हजर राहिले नसल्याने प्रथम अपील निकाली काढल्याचे दि.०६.०५.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, संचालक, डी.एम.ई.आर, मुंबई यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.१०.२००७ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती अपीलकारास दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.  अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन माहेमदीया तिब्बीया युनानी महाविद्यालय, मालेगांव या संस्थेविरुध्द प्रथम वर्ष युनानी पदवी प्रवेश प्रक्रीयेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबत माहिती मागीतली होती.  तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समितीमार्फत केलेल्या चौकशी अहवालाची प्रत सहपत्रासह दि.२०.१०.२००७ च्या पत्रानुसार विनामुल्य अपीलकारास पाठविली.  यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८०/०२**

**श्री.वासुदेव वेन्सीमल कानुंगा**
**३६२, कवर पार्क व्हिंव,**
**एण्ड मेन साउथ रोड,**
**कोरेगांव पार्क, ७ वा लेन,**
**पुणे ४११ ००१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-३, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई**
**मध्य प्रादेशिक विभाग, बावला कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड,**
**भायखला (पू), मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. वासुदेव वेन्सीमल कानुंगा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.११.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे दि.१८.०२.२००८ रोजी अर्ज करून, वरळी पोलीस ठाण्यात दि.०८.०४.२००५ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१८.०३.२००८ व दि.१९.०३.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.३१.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास दि.२६.०६.२००८ रोजी पोस्टाने माहिती पाठविण्यास जन

माहिती अधिका-यांना सांगीतले असल्याने प्रथम अपील, दि.२७.०६.२००८ रोजी आदेश पारित करुन निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.०८.०४.२००५ रोजी वरळी पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कॉलम "ए" मध्ये पार्श्र्वभूमी दिलेली होती. मुध्दा क्र. बी मध्ये अनुक्रमांक १ ते १२ मध्ये विविध मुद्यावर माहिती मागीतली होती. सदर बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलीस ठाणे यांनी अर्जदार यांना लेखी पत्राव्दारे माहिती पुरविली. मुध्दा क्र. "सी" मध्ये अपीलकार यांनी त्यांचे दि.०६.११.२००७ रोजीच्या संबंधाने अनुक्रमांक १ ते ६ मुद्यावर विविध माहिती मागीतली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलीस ठाणे यांनी सदरचे पत्र त्यांचे कार्यालयात प्राप्त झालेले नाही. असे अपीलकारास लेखी कळविले. अपीलकाराच्या दि.१८.०२.२००८ च्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिका-यांनी दि.१८.०३.२००८ व दि.१९.०३.२००८ च्या पत्रान्वये विहित कालावधीत माहिती दिली असल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.३१.०५.२००८ चे प्रथम अपील दि.०४.०६.२००८ रोजी प्राप्त झाले. सदर अपीलावर सुनावणी घेउन दि.२७.०६.२००८ रोजी आदेश पारित केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अर्ज / प्रथम अपीलावर विहित कालावधीत कार्यवाही केली असल्याचे दिसून येते. अपीलातील कागदपत्रावर दि.१८.०२.२००८ च्या अर्जाची प्रत उपलब्ध नाही. जन माहिती अधिका-यांने दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, मुध्दा "अ" मध्ये ४, "ब" मध्ये १२ व "क" मध्ये ६ मुद्यावर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी मुध्देनिहाय उत्तर दिले असल्याचे दिसते. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या

आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २४.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६१६/०२**

**श्री.संजय ज्ञानदेव डगडाळे**
**मु.पो.डोणगाव, ता.मेहकर,**
**जि.बुलडाणा. खंडोबा परिसर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. संजय ज्ञानदेव डगडाळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.२६.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे यांच्याकडे अर्ज करुन, पटवारी यांना वारसा दाखला देण्याचा अधिकार आहे किंवा नाही याची माहिती मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार कागदपत्र किंवा इतर स्वरुपातील नकला देणे अपेक्षीत असून मत नोंदविणे, प्रचलीत पध्दतीनुसार कार्यवाहीवर भाष्य करणे अपेक्षीत नाही असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समर्थन करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारास

जन माहिती अधिकारी तथा तलाठी व मंडळ अधिकारी यांनी माहिती दिली आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मंडळ अधिकारी यांनी माहिती दिली आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी मेहकर जिल्हा बुलढाणा यांनी त्यांच्या दि.१३.०८.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास आपली बाजू मांडण्यासाठी कळविले होते. अपीलकारास जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी वेळोवेळी माहिती दिली आहे.

तलाठयांना दिलेल्या कर्तव्य व जबाबदा-यानुसार तलाठयाकडे असलेल्या नोंदवहीनुसार (वारसपंजी) तलाठयाकडे खातेदार म्हणून नोंद असल्यास अशा व्यक्तीस त्यांच्या वारसाची नोंद गाव नमुना ६ क मध्ये घेउन त्याप्रमाणे संबंधीत खातेदारास त्यांच्या वारसाचा दाखला देण्यात येतो. परंतू खातेदारा व्यतिरिक्त व्यक्तींना भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे कलम ३७१ प्रमाणे वारसाचा दाखला प्रमाणपत्र देण्याचा अधिकार मा.जिल्हान्यायाधिश यांना असल्यामुळे अशा व्यक्तींना तलाठयामार्फत दाखले देण्यात येत नाहीत. असे उप विभागीय अधिकारी मेहकर जि.बुलढाणा यांनी कळविले असल्याचा लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

FILENAME \p C:\Documents and Settings\abc\My Documents\Mr.R.Tiwari\Orders\Marathi 2009\Marathi July, 2009.doc Kamlesh

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८४९/०२**

**श्री.एच.एच.नाईक**
**सेठ एल.यु.झावेरी विद्यालय,**
**कला व सर एम.व्ही. विद्यालय व विज्ञान,**
**डॉ.एस.राधाकृष्णण मार्ग,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०६९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल शाळा व**
**जुनीअर विद्यालय, पारेख नगर,**
**कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी,**
**स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल शाळा व**
**जुनीअर विद्यालय, पारेख नगर,**
**कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. एच.एच.नाईक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.१२.२००७ रोजी अर्ज करुन श्री.पील्ले मृनल मोहन यांच्या ११ वी इयत्तेतील प्रवेशाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१२.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.पील्ले मृनल मोहन यांच्या ११ वी च्या प्रवेशाबाबत अनुषंगीक सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी आयोगाच्या समक्ष अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली.  सदर माहितीने अपीलकाराचे समाधान झाले असल्याचे दिसून येते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८४८/०२**

**डॉ.अभिजित देसाई**
**६०४-ए विंग, राजेश टावर्स,**
**राजेश नगर, जे.बी.खोट शाळेजवळ,**
**साईबाबा नगर, बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त,**
**(वैद्यकीय, शिक्षण आणि आरोग्य) नायर डेंटल, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिष्ठाता,**
**लोकमान्य टिळक जनरल हॉस्पिटल,**
**सायन, मुंबई ४०० ०२२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार डॉ.अभिजीत देसाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, अधिष्ठाता, लोकमान्य टिळक नगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, सायन, मुंबई यांच्या दि.१०.०९.२००७ च्या आदेशाविरुध्द डॉ.नीता नागेश आतनीकर यांनी दि.२४.०९.२००७ रोजी सादर केलेले निवेदनानुसार आदेशातील अवैद्यता / अनियमितता निदर्शनास आणली आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचे वेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अधिष्ठाता, लोकमान्य टिळक नगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, सायन, मुंबई यांनी दि.१०.०९.२००७ रोजी निर्गमित केलेल्या आदेशाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितय योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास अद्यावत माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८४५/०२**

**श्रीमती. आनंदी रामचंद्रन,**
**बिल्डींग २९/अे-२२, तक्शीला,**
**२ रा मजला, महाकाली केव्हज रोड,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के-पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंडावली, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के-पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंडावली, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.आनंदी रामचंद्रन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०१.२००८ रोजी अर्ज करुन, तक्षशिला सहकरी गृहनिर्माण संस्थेमधील इमारत क्र.२९ मधील फ्लॉट क्रमांक अे/३२ मध्ये अवैद्यरित्या वाढीव बांधकाम केल्याबाबत, सदर संस्थेच्या दुकान क्र.१४ व १५ मधील जागेवर अवैद्यरित्या अतिक्रमण केल्याबाबत तक्रार करुन कारवाई करण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. अवैद्य बांधकामाविरुध्द महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१ प्रमाणे नोटीस देउन त्यानुसार कारवाई करावी असे आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, तक्षशिला सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारत क्रमांक २९ मधील फ्लॅट क्र.अे-३२ मध्ये वाढीव बांधकाम केल्याची तसेच सदर इमारतीच्या दुकान क्र.१४ व १५ मधील जागा अवैद्यरित्या बळकावल्याबाबत तक्रार केली होती. अवैद्यरित्या केलेल्या बांधकामाविरुध्द महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१ प्रमाणे नोटीस घेउन त्यानुसार कारवाई करावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले होते असे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१ प्रमाणे अवैद्यरित्या केलेल्या बांधकामाविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईबाबतची माहिती पुरविण्यात यावी.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७६०/०२**

**श्री.एन.एस.ठाकूर**
**ठाकूर व्दारा, २८ मार्गशिर्षे,**
**मोरवाडी रोड, सिडको, नाशिक ४२२ ००९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आदिवासी विभाग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**आदिवासी विभाग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एन.एस.ठाकूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०४.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.१०.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.१२.२००६ रोजी अर्ज करुन, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीबाबत एकूण ११ मुद्याची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१७.०१.२००७ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२३.०२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०७.०३.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.०४.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीबाबत एकूण ११ मुद्याची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०१.२००७ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली असल्याचे सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबददल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९७/०२**

**श्री.विहार दुर्वे**
**५७३/१, पवण विहार,**
**साई पंप जवळ, जे.एम. रोड,**
**डेक्कन पुणे ४११ ००४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.वि)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्यालय, ६ मजला, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी,**
**सर्वसाधारण, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्यालय, ६ मजला, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विहार दुर्वे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०९.२००८ रोजी अर्ज करुन, महापौरांचे दि.१०.०७.१९९९ च्या व क्र.३३७ च्या दि.३०.०९.१९९९ च्या परिपत्रकाची प्रत, मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता यांच्या मालमत्तेचा तपशिल. मनपा अधिका-यांनी खरेदी केलेली स्थावर मालमत्ता इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. अर्जातील मुध्दा क्र.३ (i) (१), (२), (३) व ३ (अे) बाबत सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण) हे माहिती अधिकारी असून, याबाबत आवश्यकती माहिती अपीलकारास देणेबाबत दि.०५.०९.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले. अर्जातील अ.क्र. ३(i) (४) व ४ (अे) बाबत महापालिका आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे गोपनीय अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडून जतन केले जातात. महापालिका आयुक्त अतिरिक्त आयुक्त यांच्याकडील मालमत्तेचा तपशिल कार्यालयात उपलब्ध नाही. महापालिकेने खरेदी केलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशिल सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्याकडून स्वतंत्ररित्या प्राप्त करुन घ्यावा. अ.क्र.३ (i) (५ अे) बाबत कार्यालयात

उपलब्ध नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.२९.०९.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविण्यात आलेल्या माहितीचे समर्थन करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक कार्यवाही केली असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या दि.२४.११.२००८ च्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २८.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६२९/०२**

**श्री.ताराचंद पंचमजी तांडेकर**
**शाखा अभियंता,**
**बि.एस.सेवतकर,**
**सुरभी विहार, भाग्यश्री विद्यालयाजवळ,**
**पुंडलिकबाबा नगर, अमरावती ४४४ ६०४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.ताराचंद पं.तांडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.२७.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे दि.२०.०२.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

१) श्री.एस.टी.बशीरे व श्री.बी.बी.लोंढे यांना ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.१२९२/प्र.क्र.२६०/जन-५ मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक ०१.११.१९९३ अन्वये पदोन्नतीचे आदेश दिलेले असतांना नंतर सदरचे आदेश रद्द कां करण्यात आले.

२) ०१.०२.१९९४ रोजी सहाय्यक खोदन अभियंता / उप अभियंता वर्ग २ या पदाकरिता बिंदुनामावली प्रमाणे अनुसुचित जाती करीता पदोन्नती व नामनिर्देशाचा कोणता बिंदु रिक्त होता.

३) टी.पी.तांडेकर यांनी शासन निर्णय आपना २९२/प्र.क्र.२६०/जल-५ मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक ०२.०२.१९९४ अन्वये सहाय्यक खोदन अभियंता / उप अभियंता (यां) वर्ग २ या पदावर पदोन्नती देतांना नामनिर्देशाचा बिंदु पुर्ण असतांना व पदोन्नती चा बिंदु रिक्त असतांना त्यास पदोन्नती देतांना नामनिर्देशाची अट का घालण्यात आली.

४) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई बेंच औरंगाबाद यांचे कडिल पीटीशन क्र.१०१/१९९५ अन्वये दिनांक २४.०२.१९९५ च्या आदेशान्वये लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यांना त्या पदावर ठेवता येईल. असे आदेश असतांना लोकसेवा आयोगाकडून अनुसूचित जातीचा उमेदवार उपलब्ध झाला नसतांना देखील टी.पी.तांडेकर यांना सहाय्यक खोदन अभियंता या पदावर कायम न ठेवता पदावन्नत का करण्यात आले या बाबत माहिती मिळावी.

५) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे आदेश क्र.आपना १२९६/प्र.क्र.२००(१)/पा पु-५ मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक १४.०८.१९९७ अन्वये श्री.एस.टी.बशीरे व श्री.बी.बी.लोंढे यांना प्रथम नियुक्ती कोणत्या पदावर व कोणत्या कार्यालयात देण्यात आलेली होती. त्या आदेशाची प्रत मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.०३.२००८ रोजी माहिती पुरविली. सदरची माहिती पूर्ण प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२६.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलास अनुसरुन दि.०२.०७.२००८ रोजी माहिती पुरविली जोडपत्र अ व ब प्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सर्वश्री एस.टी.बशीरे व श्री.बी.बी.लोंढे यांच्या पदोन्नतीचे आदेश रद्द केल्याबाबत इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.१४.०३.२००८ व दि.०२.०७.२००८ रोजी पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सर्वश्री बशीरे व लोंढे यांचे पदोन्नतीचे आदेश रद्द का करण्यात आले, श्री.तांडेकर यांना पदावन्नत का करण्यात आले याबाबत

कारणमिमांसा करण्याची बाब माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाही.  अपीलकाराने मागणी केलेली कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याचे काम जन माहिती अधिका-याचे आहे.  सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे दिसून येते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६९३ अ/०२**

**श्री.राजेंद्र महादेव सोनावणे**
**घर क्र.२७/८५८, शाहू नगर, काकडे प्लॉट,**
**मु.पो.ता.जि.उस्मानाबाद. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.राजेंद्र सोनावणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०३.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०१.२००८ रोजी अर्ज करून लघु पाटबंधारे (स्था.स्तर), मंडळ, औरंगाबाद येथे अतिरिक्त ठरलेल्या पदाची सविस्तर माहिती मागीतली होती. १) अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-यांच्या पदांना शासन आदेश दि.३१.०८.२००७ नंतर मिळालेल्या मुदत वाढीचा शासन आदेशाची प्रत, २) अतिरिक्त ठरलेल्या ३४ स्था.अ.स. कर्मचा-यांचे माहे सष्टेंबर, २००७ व डिसेंबर, २००७ चे मासिक वेतन अदा करण्याची परवानगी दिलेल्या आदेशाची प्रत, ३) परिमंडळाचे स्था.अ.स. च्या बदल्या बाबतचे समावेशन दि.२७.०८.२००७ च्या कार्या. आदेशान्वये केले. ३४ पैकी आजपर्यंत किती स्था.अ.स. कार्यमुक्त झाले. कार्यमुक्त न झालेल्या कर्मचा-यांचे वेतन अदा केले ते चुकीचे की बरोबर इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०९.०१.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०७.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी समर्थन केले. यामुळे समाधान झाले नाही तर कार्यालयीन वेळेत शंका निरसन करण्यात येईल असे अपीलकारास दि.१६ मे, २००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-यांकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करून लघु पाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद येथील अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०९.०१.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सदर पत्रासोबतच्या दि.३१.०८.२००७ च्या शासन निर्णयात अपीलकाराने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीचा अंतर्भाव असल्याचे स्पष्ट होते. दि.०७.०१.२००८ च्या अपिलीर्थीच्या अर्जानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.०९.०१.२००८ च्या पत्रान्वये वेळेत माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८४६/०२**

**श्री.अजय मधुसुदन मराठे**
**५०४, न्यु सर्वोदय को.हौ.सोसा,**
**सेक्टर-८, प्लॉट २९-बी,**
**वाशी-नवी मुंबई ४०० ७०३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे**
**कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे**
**कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अजय मराठे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचकडे दि.२९.०८.२००७ रोजी अर्ज करुन हिंदुस्थान टाईम्सच्या दि.२९.०८.२००७ च्या अंकात तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांची व Assembly, Parliament full of criminals any way... अशी बातमी छापून आली होती. याबाबत १) नाव २) कोणता गुन्हा केला आहे ३) कोणत्या कोर्टाने /अन्य संस्थेने गुन्हेगार ठरविले आहे याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.०६.१०.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. दिलेल्या website (CEO Maharashtra.in ) या संकेत स्थळावर images स्पष्ट वाचता येत नाहीत. म्हणून माहिती पुरवावी यासाठी प्रथम अपील दाखल केले. सदरील माहिती एकूण १११ पाने असून प्रती प्रत रु.२/- प्रमाणे एकूण २२२ रु. व पोस्टखर्च रु.५०/-असे एकूण २७२ रु.पैसे बंकेत भरुन माहिती हस्तगत करावी असे जन

माहिती अधिका-यांनी दि.१४.१२.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश दिले नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, तात्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांची दि.२९.०८.२००७ च्या हिंदुस्थान टाईम्समध्ये बातमी छापून आली होती. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झाले नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यापरिस्थित मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सर्व संबंधीत जिल्हाधिका-यांना लेखी असे कळवावे की सन २००७ च्या लोकसभा / विधानसभेच्या उमेदवाराबाबची कागदपत्र अपीलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९८/०२**

**श्री.आण्णासो सांतगोडा पाटील**
**मु.पो.टाकवडे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,**
**नवीन प्रशासकीय इमारत, कोल्हापूर, १ ला मजला,**
**बावडा रोड, कोल्हापूर.**

**जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२,**
**करवीर क्र.१, कोल्हापूर. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.आण्णासो पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.१२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांचकडे दि.११.०६.२००८ रोजी अर्ज करून मौजे टाकवडे ता.शिरोळ येथील गावठाण जागेचे खरेदीपत्राची नक्कल खरेदीपत्र क्र.१२१७ दि.२८.१०.१९४९ खरेदी घेणार - राम देसाई व महादेव रामा देसाई. खरेदी देणार - रामा हरी वगैरे. सदर खरेदीपत्राची इंडेक्स उत्ता-याची नक्कल मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी पुढीलप्रामणे माहिती दिली. १) मौजे टाकवडे ता.शिरोळ येथील खरेदीपत्र क्र.१२१७, दि.२८.१०.१९४९ पाने २ फी रु. १० कोर्ट फी तिकीट रु.२० २) इंडेक्स उतारा पान-१ फी रु.५/- कोर्ट फी रु.२०. सदर आवश्यकती फी जमा केल्यानंतर माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०७.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराने मनी ऑर्डर पाठविली. जन माहिती अधिका-यांनी Money order घेतली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०९.२००८ रोजी प्रथम अपील

दाखल केले.  अपीलकाराने मनिऑर्डर जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक वर्ग-२ करवीर क्र.१ यांच्या नावाने केलेले नाही.  आवश्यक असणारी फी तिकीटे जमा केले नसल्याने अपीलकारास माहिती पुरविली नाही.  माहितीपोटी शुल्क जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२ करवीर क्र.१ यांचे कार्यालयात जमा केलेली नसल्याचे कारण नमुद करुन दि.१४.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. माहिती पोटी आवश्यक शुल्क भरल्यानंतर अपीलकारास मागणी केलेली नक्कल / माहिती देण्यात येईल असे ही प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेशात नमुद केले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन गावठाण जागेची खरेदी पत्राची नक्कल, खरेदीपत्राची इंडेक्स उता-याची नक्कल मागीतली होती.  माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते.  अपीलकाराने, जन माहिती अधिकारी (कोल्हापूर) या पदनामाने रु.३५/- इतक्या रक्कमेशी Money order केली होती.  मनिऑर्डर जन माहिती अधिका-यांच्या नावाने पाठविली नसल्याच्या कारणावरुन मनिऑर्डर स्विकारली नाही ती परत गेली. यामुळे अपीलकारास आद्याप माहिती मिळालेली नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने केलेली मनिऑर्डर जन माहिती अधिका-यांनी स्विकारली नाही.  माहिती दिली नाही.  तेव्हा जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मोफत माहिती द्यावी.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

 FILENAME \p C:\Documents and Settings\abc\My Documents\Mr.R.Tiwari\Orders\Marathi 2009\Marathi July, 2009.doc Kamlesh

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल केलेले व्दितीय अपील.**

**अपील क्र.२००९/२११/०२**

**श्री.आनंद वेंकटपती मंडया**
**व्दारा-संजय किन्नरकर,**
**२, कला बिल्डींग,**
**१७ वा रस्ता, खार (प),**
**मुंबई ४०० ०५२.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,**
**राज्य गुप्तवार्ता विभाग यांचे कार्यालय,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्य गुप्तवार्ता विभाग यांचे कार्यालय,**
**मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.आनंद मंडया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन अपीलकाराच्या कार्यालयीन कामासंदर्भात प्रतिकूल शेरे दिले आहेत काय? दि.०१.०४.२००३ ते दि.३१.०३.२००८ या कालावधीत अपीलकाराविरुध्द दिलेल्या प्रतिकूल शे-याच्या कागदपत्राच्या छायाप्रतीची अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यींन विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने अपीलकारास, प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची एक संधी आहे. परंतू सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येत नाही. अपीलकाराने थेट राज्य माहिती आयोगाकडे, जन माहिती अधिका-याविरुध्द अपील दाखल केल्याचे दिसून येते.

सदर अपीलावर दि.०९.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या कार्यालयीन कामकाजाबाबत दि.०१.०४.२००३ ते ३१.०३.२००८ या कालावधीत प्रतिकूल शेरे दिले असल्यास त्यांच्या छायाप्रतीची अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या कार्यालयीन कामकाजासंदर्भात त्यांच्या विरुध्द प्रतिकूल शेरे देण्यात आले आहेत काय? याबाबतची माहिती, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०४४/०२**

**श्री.मदनलाल ठाकुरप्रसाद त्रिवेदी**
**बि.क्र.१७, खो.क्र.१६, बिएससी कॉलनी,**
**शिवाजी नगर, खेरवाडी रोड,**
**बांद्रा (पुर्व) मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव/उप सचिव,**
**गृह विभाग, पोल-७, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/अवर सचिव,**
**गृह विभाग, पोल-७, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मदनलाल त्रिवेदी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०८.२००८ रोजी अर्ज करुन खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१) पोलीस गृह निर्माण, पोलीस कल्याणाच्या बाबीबाबत गृह विभागाच्या ताब्यात असलेली जी पोलीस आयुक्तालय बृहन्मुंबई सशस्त्र पोलीस मरोळ, मरोळ मरोळशी रोड, अंधेरी (पु), मुंबई ५९ यांच्या ताब्यात असलेली ९६ एकर २८ गुंठे ४ आणि जागेपैकी मोकळया जागेवरील मोकळया भुखंडावर टाकण्यात आलेल्या मातीच्या भरावाबाबत गृहविभागाच्या पुर्व परवानगीने टाकण्यात आलेल्या आहेत काय असल्यास त्याबाबत गृहविभागाच्या आदेशाची प्रत उपलब्ध व्हावी. शासकीय भुखंडावर दुरुपयोग केलेला असल्यास त्यादोषीवर खात्यामार्फत कारवाई होउ शकते किंवा नाही याची माहिती द्यावी.

२) जावक. क्र.३७८७/बोउआ/पोउआ/सपोंम/०६ दिनांक ०६.११.२००६ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागविण्यात आलेल्या माहितीमध्ये उत्तर प्राप्त झालेले आहे अनेक ठेकेदार व पोलीस अधिकारी यांनी मातीचा भराव मोकळया जागेमध्ये टाकतांना शासन नियमानुसार अटी व

नियमाचे उल्लघंन करुन करण्यात येत आलेली आहे काय.  अशा दोषींवर गृहविभागामार्फत काय कारवाई होउ शकते.  याची माहिती द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.  यामुळे अपीलकाराने दि.१३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सशस्त्र पोलीस, मरोळ, मरोळ मरोळशी रोड, अंधेरी (पू), मुंबई येथील पोलीस विभागाच्या ताब्यात असलेल्या मोकळया भूखंडावर टाकण्यात आलेल्या मातीच्या भरावाबाबत विविध मुद्यावर माहिती मागीतली होती.  सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, मुंबई कार्यालयाकडून दि.१५.१०.२००८ रोजी प्राप्त झालेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली.  अपीलकारास निशुल्क माहिती दि.१५.१०.२००८ च्या पत्रान्वये पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर केला. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३१.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

 FILENAME \p C:\Documents and Settings\abc\My Documents\Mr.R.Tiwari\Orders\Marathi 2009\Marathi July, 2009.doc Kamlesh

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५५६/०२**

**श्री.रविंद्र माधव चौधरी**
**२८, विद्या विहार, प्रताप नगर,**
**नागपूर-२२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,**
**सेंट जार्ज रुग्णालय, आवार, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,**
**सेंट जार्ज रुग्णालय, आवार, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रविंद्र चौधरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.१०.२००८ रोजी अर्ज करुन, शासकीय वैद्यकीय दंत महाविद्यालयातील ग्रंथपाल/शा.शि.निर्देशक यांची वरिष्ठ श्रेणी / निवडश्रेणीमध्ये वेतन निश्चीती करण्यासाठी शासन निर्णयानुसार उजळणी अभ्यासक्रम पूर्ण करणे क्रमप्राप्त आहे. श्री.म.गो.पवार, शा.शि.निर्देशक, श्री.अशोक सेलोकर, शा.शि.निर्देशक, श्रीमती.ज्यो.वि.बर्दापूरकर, ग्रंथपाल, श्रीमती.एस.ए.लाड, शा.शि.निर्देशक यांनी अभ्यासक्रमात निर्धारित कालावधीत सहभाग घेतला नाही/ पूर्ण केला नाही. तरी त्यांना कोणत्या निकषानुसार वरिष्ठ/निवडश्रेणीमध्ये वेतननिश्चीती केली याबाबत माहिती मगीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.०४.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, ग्रंथपाल/शा.शि.निर्देशकांची वरिष्ठ / निवडश्रेणीमध्ये कोणत्या निकषानुसार वेतननिश्चिती करण्यात आली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने म्हणजे दि.१९.०५.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकार / आयोगाकडे क्षमायाचना (Apologised) केली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३१.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६५६/०२**

**श्री.शेख निसार अहमद तांबोळी**
**व्दारा, संस्था अध्यक्ष शेख निसारअहमद तांबोळी,**
**३५, ब, अनम पॅलेस, अविष्कार कॉलोनी,**
**४० गांव रोड, धुळे ४२४ ००१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शेख निसार अहमद तांबोळी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०६.२००७ रोजी अर्ज करुन खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१) शैक्षणिक वर्ष २००७-०८ या वर्षात अनधिकृत प्राथमिक शाळा विरुध्द फौजदारी गुन्हा ज्या शासकीय निर्णय, आदेश अथवा परिपत्रकान्वये दाखल करण्याचे प्रायोजन असेल त्या संदर्भात/साक्षांकित दस्तावेजची प्रत.

२) तसेच ज्या कायदा अथवा नियमान्वये येणे प्रमाणे कार्यवाही करण्याचे प्रयोजन असेल त्या कायदा/नियम काड चे नांव व कलम अथवा नियम क्रमांक.

३) मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ चे निर्णय याचीका क्रमांक १७७३/२००३ निर्णय दि.११.०४.२००८ (ग्राम विकास शिक्षण प्रसारक मंडळ वा महाराष्ट्र राज्य) या निर्णयाचे परिच्छेद ८(७) (२) चे विचार करुन अल्पसंख्यांक संस्थांना प्राथमिक शाळा सुरु करण्यासाठी चालू

शैक्षणिक वर्षात शासनाकडून नविन खाजगी प्राथमीक शाळा सुरु करणेबाबत प्रस्ताव मागविण्याचा आदेशाच आवश्यकता नाही तरी सुध्दा या बाबत एखादे न्यायालीन आदेश असेल तर त्याची सांक्षांकित झेरॉक्स प्रत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७ जुलै, २००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.२८.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.२८.०९.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कादगपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वरील परिच्छेद एक मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन अर्जावर / प्रथम अपीलावर, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिली असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२९२०/०२**

**श्री.रामदास श्रीपत जगताप**
**जनसेवा रहिवाशी संघ सेंन्ट झेवियर कॉलेज शेजारी,**
**माहिम कॉजवे रोड (प), मुंबई ४०० ०१६.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**(स.आ.जी./उत्तर) बृहन्मुंबई महानगरपालिका**
**इमारत जी/उत्तर रुम नं.२०, हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर (प), मुंबई ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी,**
**महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**जी/उत्तर विभाग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.रामदास जगताप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.११.२००८ रोजी अर्ज करुन खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१ जानेवारी, २००४ ते २७ नोव्हेंबर, २००८ या कालावधी दरम्यानचे जी/उत्तर विभागातील माहिम येथील डॉ.जगताप मॅटर्निटी ॲन्ड जनरल नर्सिंग होमचे डॉ.राजाराम सिताराम जगताप, डॉ.पुष्पा राजाराम जगताप, डॉ.बेला जगताप पलनिटकर व डॉ.उदयन पलनिटकर यांनी विविध धर्मांचया रुग्णांना मृत जाहिर करुन अंतिम विधीकरिता मृत व्यक्तींच्या नांवे दिलेल्या दाखल्यांची जी/उत्तर विभागातील मृत नोंद पुस्तिकात नोंद असलेल्या मृत व्यक्तींची माहिती मिळणे तथा अंतिम विधीकरिता सदर डॉक्टरांनी मृत जाहिर करुन दिलेल्या वैद्यकीय दाखल्याच्या मुळ प्रतींच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत.

अपीलकाराने मागीतलेली माहिती विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांनी दिली नाही. जन्म आणि मृत्यू अधिनियम, १९६९ अनुसार अशी माहिती देण्याची तरतूद नसल्याच्या कारणावरुन विहित

कालावधीत म्हणजे दि.२६.१२.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली आहे. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१५.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कादगपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वरील परिच्छेद एक मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२६.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्‍चितच योग्य नाही. जन माहिती अधिका-याने जाणीवपूर्वक सुडबुध्दीने माहिती नाकारल्याचे सिध्द होत नाही. यामुळे जन माहिती अधिका-यास शास्ती लावण्याचा प्रश्‍न उद्‌भवत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**<u>आदेश</u>**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२१४२/०२**

**श्री.शैलेश यज्ञेश्वर कोरे**
**२/३, परेश चाळ, कृष्णनगर,**
**बांदेकर वाडी, जोगेश्वरी (पू),**
**मुंबई ४०० ०६०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मा.वि.वि-४, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**अंधेरी, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शैलेश कोरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०३.२००७ रोजी अर्ज करून खालील माहिती मागीतली होती.

जोगेश्वरी, बांद्रेकर वाडी येथील रस्ता रुंदीकरणांत येणा-या ब-याच सदनिकांचा ताबा (लगतची सदनिका क्र.७६०, श्रीमती.सुवर्णा चोपडेकर) देण्यात आला असून दि.०४.०५.२००५ रोजी माझ्या निष्कासित झालेल्या सदनिकेचा ताबा आजतागायत का देण्यात आला नाही?

सदनिका निष्कासित झाल्याबद्दल आपणांस लेखी कळविले असून, त्याबाबत आपल्या अधिका-यांने सदर जागेचा सर्वे केलेला आहे. तरी पर्यायी सदनिकेची तरतूद का करण्यात आली नाही आणि सदनिकेचा ताबा घेते वेळी सदनिकेचे बांधकाम अनिवार्य आहे की नाही याबाबत माहिती मिळावी.

अपीलकाराचे तसेच अपीलकाराच्या बाजुचे श्रीमती.सुवर्णा चोपडेकर क्र.७६० यांचे घर पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या ६१.०० मी.रुंदीमध्ये (Row) बाधीत झालेले नाही. तसेच निष्कासना विषयीची माहिती, भूमी व्यवस्थापक, भूमी शाखा, ४ था मजला, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला संकूल, मुंबई यांचेकडून उपलब्ध होईल अशी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती चुकीची व परिपूर्ण नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे, प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कादगपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जोगेश्वरी, बांद्रेकर वाडी येथील रस्ता रुंदीकरणात येणा-या ब-याच सदनिकांचा ताबा (लगतची सदनिका क्र.७६० श्रीमती.सुवर्णा चोपडेकर) देण्यात आला. अपीलकाराच्या निष्कासीत झालेल्या सदनिकेचा ताबा का देण्यात आला नही याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. पश्चिम द्रुतगती महामर्गाच्या ६१.०० मीटर रुंदीमध्ये (आर ओ डब्ल्यू) जोगेश्वरी (पू) येथील नाल्याजवळ असलेली अपीलकाराची झोपडी प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागाने निष्कासीत केली नाही. दि.०५.१२.२००८ रोजी कार्यालयाचे प्रतिनिधी समवेत जागेची पहाणी केली. साईट पहाणी अहवालाप्रमाणे अपीलकाराच्या

झोपडी लगत WC आहे. अपीलकार यांनी केलेल्या निवेदनानुसार त्यांच्या तोडण्यात आलेल्या झोपडीची जागा रिकामी आहे. त्यालगत मोठा नाला असल्याचे तसेच ही जागा प्राधिकरणाच्या निष्कासन पथकाव्दारे तोडण्यात आलेली नाही असे अहवालात नमुद केले. अपीलकाराची झोपडी पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या रुंदीकरणात (Row) येत नसल्याने अपीलकाराचे प्रकरण पर्यायी जागा देण्याकरिता MMRDA ने विचारात घेतले नाही. याबाबत अपीलकारास माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३१.०७.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६२८/०२**

**श्री.चेतन अशोक लोहिया**
**बालचंद ब्रुस इंजिनिअर्स प्रा.लि.**
**ई-११ एम.आय.डी.सी, ए/पी-अकोला,**
**जि.अकोला. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक,**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वाहतुक भवन,**
**डॉ.अे.एन.नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक (वाहतुक)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वाहतुक भवन,**
**डॉ.अे.एन.नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चेतन अशोक लोहिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.२७.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०७.२००७ रोजी अर्ज करुन, राज्य परिवहन महामंडळाने पार्सल वाहतुकीकरिता नियुक्त केलेल्या परवानाधारकासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.०७.२००७ च्या पत्रान्वये एकूण २५ मुद्यावर मुध्देनिहाय माहिती पाठविली. जन माहिती अधिका-यांनी फार थोडी माहिती पुरविली. अपीलकाराने विचारलेल्या ब-याच प्रश्नाबाबत उचित उत्तर दिले नाही. असंबंधी, तात्पुरती, विशिष्ट अशी माहिती, जन माहिती अधिका-यांनी पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय

प्राधिका-याकडे दि.२०.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकाराने बरीचशी माहिती ही स्पष्टीकरण, प्रश्न या स्वरुपात विचारण्यात आली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) अनुसार प्रश्नोत्तरे, स्पष्टीकरण इत्यादी संदर्भात माहिती देणे अभिप्रेत नाही. तथापि, अपीलकार यांना उचित माहिती प्राप्त व्हावी म्हणून, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे दि.२४.०७.२००७ च्या पत्रान्वये दिली आहेत.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती महामंडळाकडे सहज उपलब्ध आहे. अशी माहिती कालमर्यादेत अपीलकारास देण्यात आली आहे. परवानाधारकाची निवड करण्यासाठी अवलंबीलेली कार्यपध्दतीबाबतची कागदपत्रे देण्याचे अनावधानाने राहून गेले होते. अपिलार्थी यांना परवानाधारकाच्या निवड करण्याची कार्यपध्दती बाबतची माहिती, कागदपत्रे ३ दिवसात देण्यात यावीत. या प्रकरणी माहिती अधिकारी यांनी अपीलकारास उर्वरित सर्व माहिती दिलेली असल्याचे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन राज्य परिवहन महामंडळाने पार्सल वाहतुकीकरिता नियुक्त केलेल्या परवानाधारकासंबंधी अनुषंगीक एकूण २५ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली. उर्वरित माहिती अपीलकारास देणेबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. अपीलकाराने मागीतलेल्या माहितीचे व्यापक स्वरुन आहे. माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ अनुसार माहिती प्राप्त करुन घेण्यास काही मर्यादीत वाव आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-याने माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात काही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९६/०२**

**श्री. दिनकर सदाशिव कांबळे**
**४०, वानवडीगांव, पुणे ४११ ०४०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दिनकर कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

राज्य सरकारी कर्मचा-यांनी त्यांच्या नोकरीशी सबंधीत बाबी विषयी सादर केलेल्या विनंती अर्ज किंवा वकीलामार्फत पाठविलेल्या नोटीसा याची तत्परतेने दखल घेउन त्यावर योग्या तो निकाल देण्याचे परिपत्रक निर्गमित करून सर्व विभागांना सूचना देणेबाबत मा.उच्च न्यायालयाने मुख्य सचिवांना आदेश दिले होते. याबाबत खालील दोन मुद्याबाबत अपीलकाराने माहिती मागीतली होती.

१) गव्हमेंट प्लीडर यांनी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मुख्य सचिव यांना परिपत्रक काढण्यासाठी केव्हा व कोणत्या पत्राने कळविले त्याची प्रत.

२) मुख्य सचिव यांनी उच्च न्यायालयाचे आदेशानुसार काढलेल्या परिपत्रकाची प्रत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराकडून रु.४५/- एवढे शुल्क घेउन अपीलकारास दि.०७.०९.२००७ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. विहित कालावधीत अपील दाखल न होण्यास संयुक्तीक कारण आढळत नाही म्हणून प्रथम अपील फेटाळण्यात आले. त्यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन, वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०७.०९.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. त्यामध्ये सहाय्यक सरकारी वकीलाच्या दि.०३.०४.२००७ च्या पत्राची प्रत, त्यानुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या दि.१८.०५.२००७ च्या परिपत्रकाची प्रत व अनुषंगीक माहितीचा समावेश असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. न्यायालयीन प्रकरणी सूचना / अभिलेख / कागदपत्रे / परिच्छेनिहाय उत्तर उपलब्ध करुन पुढील आवश्यकती कार्यवाही करण्याबाबत शासनाने दि.१८.०५.२००७ च्या परिपत्रकान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना सूचना दिल्या असल्याचे दिसते. व्यथीत व्यक्तीच्या वकीलांनी दिलेली नोटीसीची वेळीच दखल घेउन न्यायालयीन प्रकरणी आवश्यकती पुढील कार्यवाही तात्काळ करावी. याबाबत शासनाने सर्व विभागांना दिलेल्या सूचनासंबंधीच्या परिपत्रकाची प्रत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५३२/०२**

**श्री. अरविंद नारायणराव नंदनवार**
**अध्यक्ष, महानंद बहुउद्‌देशिय विकास सामाजिक संस्था,**
**श्रीनिवास कॉलनी रोड, रामनगर,**
**वर्धा ४४२ ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी संचालक**
**महाराष्ट्र स्टेट को.ऑप.कन्झुमर फेडरेशन. लि.**
**८७ ए.राज चेबंर्स ५ वा मजला,**
**देवजी रतनशी मार्ग, दाणाबंदर मुंबई ४०० ००९.**

**जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी संचालक**
**महाराष्ट्र स्टेट को.ऑप.कन्झुमर फेडरेशन. लि.**
**८७ ए.राज चेबंर्स ५ वा मजला,**
**देवजी रतनशी मार्ग, दाणाबंदर मुंबई ४०० ००९.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अरविंद नारायणराव नंदनवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.११.२००८ रोजी अर्ज करुन खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१) पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचा अहवाल क्रं. पणन-६/२००६/४२३ दि.२४.११.२००६ व अहवाल क्रं. पणन-७/१३ दि.१५.०७.२००७ अन्वये नागपूर विभागातील वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटल यांना अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्याचे काम कोणतेही निविदा

न काढता नियमबाहय खाजगी व्यापा-यांना काम दिलेले आहे. हा अहवाल आम्हास व महाराष्ट्र शासनास प्राप्त झाल्यामुळे ग्राहक महांसघ मुंबई व त्या अंतर्गत महाराष्ट्रातील विभागीय कार्यालय यांनी ग्राहक महासंघ मुंबई स्थापन झाल्यापासून तर आत्तापर्यंत शासनाच्या कोणकोणत्या विभागात निविदा न काढता किती रुपयांची खाजगी व्यापा-यांना कामे दिलेली आहेत. त्याचा विस्तृत तपशिल सत्य प्रतिलींपीसह देण्यात यावा.

२) वरील कामे निविदा न काढता खाजगी व्यापा-यांना दिल्यामुळे महाराष्ट्र शासन नियमानुसार वरील कामे न केल्यामुळे विशेष लेखा परीक्षक वर्ग-१ यांनी वरील चौकशी अहवालावरुन आपणास दिलेल्या अहवालाची सत्य प्रतिलीपीसह अहवालाची प्रत व माहिती देण्यात यावी.

३) महाराष्ट्र शासनाचे आदेश क्रं.स प स १००७/प्र.क्र.१६०/२४ सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ५ जाने, २००८ अन्यवे ग्राहक महांसघ मुंबई यांनी महानंदा बहुउद्देशिय विकास सामाजिक संस्था यांना नागपूर विभागातील वैद्यकिय मेडीकल कॉलेज व रुग्णालय यांना ग्राहक महांसघ मुंबई यांनी अधिकृत पुरवठादार नियुक्त करुन ग्राहक महासंघ नागपूर यांच्या मार्फत अन्नधान्य व इतर वस्तुंचा पुरवठा करण्याची परवानगी दिलेली होती. त्याचा तपशिल व शासन निर्णयाची तारीख संपल्यामुळे पुरवठा बंद करण्यात आला हे खरे आहे काय?

४) ज्या शासन निर्णयानुसार येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये यांना ग्राहक महासंघामार्फत कामे देण्यात आलेली होती. त्या शासन निर्णयाची मुदत दि.२७.०७.२००८ रोजी संपलेली असल्याने आमचे काम बंद करण्यात आले असुन ग्राहक महासंघ मुंबई यांनी कोणत्या शासन निर्णयानुसार ग्राहक महांसघ नागपूर यांना वरील पुरवठा बंद न करता व पुरवठा खंडित न

करता तसेच निविदा न काढता खाजगी व्यापा-यांना पुरवठा करण्याची परवानगी दिलेली आहे व तो पुरवठा चालू आहे. याची माहिती सत्य प्रतिलिपीसह देण्यात यावी.

५) ग्राहक महासंघ मुंबई यांचे विभागीय कार्यालय नागपूर यांनी आमच्या संस्थेचा पुरवठा थांबविण्याकरिता चुकीचे बिले सादर करणे तसेच मा. अधिष्ठाता यांनी वेळोवेळी तक्रार पत्रे देवून तसेच दि.२५.०६.२००८ च्या सभेत वरील दराला मंजुरी दिल्याच्या सभेमध्ये प्रत्येक महिन्याची बिले पुढील महिन्याच्या ७ दिवसाच्या आत सादर करण्याचा ठराव घेवून आमचा पुरवठा थांबविण्याकरिता बिले वेळेच्या आत सादर न करणे, तसेच आमचे संस्था नुकसानीत येण्याकरिता ५० लाख रुपयांच्या वस्तुंची बिले न निघण्याकरीता कोणताही पाठपुरवठा न करण्याचा तपशिल देण्यता यावा.

६) तसेच मा.पणन मंत्री तथा महाराष्ट्र शासनाचे आदेश ग्राहय करुन निविदा न काढता नियम बाहय खाजगी व्यापा-यांचा पुरवठा त्वरीत थांबवून ग्राहक महासंघ मुंबई यांनी आमच्या संस्थेस ग्राहक महासंघ नागपूर मार्फत वस्तुंचा पुरवठा करण्याची परवानगी देण्यात येणार आहे काय? तसेच तसा नियम आहे काय? असल्यास त्याच्या नियमाच्या सत्य प्रतिलिपीसह माहिती देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता संचालक, कन्झुमर्स फेडरेशन मुंबई यांनी अपूर्ण तसेच असमाधानकारक माहिती दिली असल्याच्या कारणावरुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.२२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अर्जातील मुध्दा क्रमांक १ व ३ बाबतची माहिती

अपीलकारास १५ दिवसात द्यावी असे आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०५.२००९ रोजी Video Conferncing वर सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, १) नागपूर विभागातील वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पीटल यांना अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्याचे काम निवीदा न काढता खाजगी व्यापा-यांना कामे दिलेली आहेत याचा अपीलकाराने तपशिल मागीतला होता. २) ज्या शासन निर्णयान्वये वैद्यकीय महाविद्यालयांना पुरवठा करण्याबाबत मुदतवाढ प्राप्त झाली. त्या शासन निर्णयाची अपीलकाराने मागणी केली. तसेच सद्या अशा वैद्यकीय महाविद्यालयांना पुरवठा चालू आहे काय याबाबतची माहिती मिळावी अशी अपीलकाराने माहिती मागीतली होती. सदर दोन्ही मुद्याची, जन माहिती अधिका-यांने माहिती दिली नसल्याने सदर माहिती १५ दिवसाचे आत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली किंवा कसे हे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. वर नमुद केलेल्या दोन मुद्याची माहिती हे आदेश प्राप्त

झाल्यापासून दोन आठवडयाच्या आत अपीलकारास पुरविण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३१३/०२**
**अपील क्र.२००९/२६५७/०२**
**अपील क्र.२००९/२६७०/०२**

**श्री. शंकरराव विठ्ठलराव राउत**
**सुर्य १०४, शासकीय निवासस्थाने,**
**गोविंदपुरा नाक्याजवळ,**
**अहमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**न्यायसहाय्यक वैज्ञनिक प्रयोगशाळा,**
**संचालनालय, विदयानगरी, हंस भुग्रा मार्ग,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**न्यायसहाय्यक वैज्ञनिक प्रयोगशाळा,**
**संचालनालय, विदयानगरी, हंस भुग्रा मार्ग,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शंकरराव राउत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०३.२००८ व दि.२७.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

अपीलकाराचा मुलगा दत्तात्रय यांच्या खुनाबाबत कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गुन्हा रजीस्टर क्र.३१४/०६ हा दाखल करण्यात आला होता. मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांनी आरोपीच्या नार्को चाचण्या घेण्याचे आदेश दिले. याबाबत अपीलकाराने जन माहिती अधिकारी, वैज्ञानिक

प्रयोगशाळा विद्यानगरी हंस गुप्ता मार्ग, सांताक्रुझ (पू), मुंबई यांच्याकडे खालील मुद्यावर माहिती मागीतली होती.

१) गुन्हयातील आरोपीच्या वैज्ञानिक चाचण्या घेणेबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना क्र.आर/११८/१३८४/०७, दि.२२.०८.२००७ रोजी पत्र दिले. ६ आरोपीच्या चाचण्या दि.२९.१०.२००७ रोजी झाल्या. उर्वरित आरोपी श्री.चंद्रकांत विठ्ठल नागदेव यांची चाचणी दि.२६.११.२००७ चे दरम्यान झाली. त्या चाचणीची CD/VCD ची प्लेट द्यावी.

२) ज्या चाचण्या घेण्यात आल्या त्याबाबतचा तपशिल.

३) तपासणीच्या अहवालाची साक्षांकित प्रत.

४) कोतवाली पोलीस स्टेशन अहमदनगर यांनी कार्यालयास पाठविल्या क्र.७२२६/०७ दि.२९.१०.२००७ च्या पत्राची छायाप्रत.

५) पोलीस अधिका-याने दिलेल्या प्रश्नावलीची छायाप्रत.

६) दि.२९.१०.२००७ च्या पत्राप्रमाणे ब्रेन इलेक्ट्रीकल ॲनीलेशन प्रोफायलिंग टेस्ट झाली असल्यास त्या अहवालाची छायाप्रत. नसेल तर स्पष्टीकरण.

७) श्री.नागदेवची चाचणी घेणारे तज्ञांची नावे.

८) जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे क्र.आर/११८/१०९८/०७ दि.२१.०७.२००७ व १३८४/०७ दि.२४.०८.२००७ प्रमाणे श्री.नागदेवच्या चाचण्या झाल्या त्याबाबत व झाल्यानसल्यास त्याबाबत स्पष्टीकरण.

९) कोणत्या चाचण्या झाल्या त्याबाबत माहिती प्रत.

१०) आपल्या प्रयोगशाळेवर मंत्रालयातील कोणत्या विभागाचे नियंत्रण आहे ती माहिती.

११) आरोपीनिहाय चाचण्या घेणारे डॉक्टरांची नावे.

१२) प्रयोग शाळेचा फोन क्रमांक

१३) अंतीम अहवालाची छायाप्रत.

१४) पोलीसांना दिलेल्या पत्राच्या छायाप्रती.

१५) सर्वश्री तुकाराम विठ्ठल सुतार, शेख मंजूर अहमद शेखमहमद, भिमराज भाउसाहेब दातरंगे, सर्जिराव बालाजी शिंदे, विठ्ठल मारुती शेळके, भानुदास एकनाथ कोतकर या आरोपीच्या चाचण्या झाल्या त्याबाबत तारिख निहाय तपासणी अहवालाची छायाप्रत.

१६) नार्को चाचण्या घेउ नयेत याबाबत घेतलेल्या निर्णयाबाबत अधिका-यांची नावे, हुध्दा इत्यादी माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.१२.२००७, दि.२६.१२.२००७ व दि.२८.०३.२००८ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

१) पॉलिग्राफ चाचणीची Video किंवा Audio Recording करण्यात येत नाही.

२) सदर प्रकरणात फक्त पॉलिग्राफ चाचणी दि.३०.११.२००७ रोजी करण्यात आलेली आहे.

३) तपासणीचा अहवाल सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट असल्यामुळे माहिती अधिकारी कायदा २००५ च्या कलम ८(१) (ख) अन्वये राखून ठेवण्यात येत आहे.

४) व ५ मुद्दा पोलीस अधिका-यांनी दिलेली प्रश्नावलीची छायांकित प्रत आणि कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर यांनी कार्यालयास दिलेले पत्र क्र.७२२६/०७ दि.२९.१०.२००७ च्या पत्राची

छायांकित प्रत ही कागदपत्रे कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर यांच्याकडून प्राप्त करण्यात यावी.

६) सदर प्रकरणात BEOSP, ही चाचणी गैर लागू असल्यामुळे करण्यात आलेली नाही.

७) या प्रयोगशाळेतील मानसशास्त्र विभागातील येथील सर्व तज्ञांनी व सहाय्यकांनी मिळून श्री.नागवडे यांची पॉलिग्राफ चाचणी केलेली आहे.

८) श्री.नागवडे यांची फक्त पॉलिग्राफ चाचणी झालेली आहे.

आपण आपल्या पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे या प्रयोगशाळेत सदर आरोपींच्या काही मानसशास्त्रीय चाचण्या झाल्या आहेत, परंतु त्याची Video किंवा Audio C.D. बनविण्यात आलेली नाही. तसचे सदर प्रकरण न्याप्रविष्ठ असल्याने त्यासंबधीचा कोणताही दस्तऐवज केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (ख) अन्वये कोणसही दिला जात नाही याची नोंद घ्यावी.

ही प्रयोगशाळा गृह खात्याच्या अखत्यारीत येत असून वरील मानसशास्त्रीय चाचण्या या प्रयोगशाळेतील त्या विभागातील अधिकारी एकत्रितपणे करत असतात.

मुद्‌दा क्र.(१) व (२)

सदर प्रकरणाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातुन सखोल अभ्यास केल्यानंतरच या प्रयोगशाळेच्या मानसशास्त्रीय विभागाने या प्रकरणात पॉलिग्राफ ही चाचणी उपयुक्त ठरु शकते असा निष्कर्ष काढल्यामुळे पॉलिग्राफ चाचणी करण्यात आलेली आहे आणि म्हणूनच नार्कोचाचणी टाळली असले म्हणता येणार नाही.

मुद्दा क्र.(३) व (४)

सदर पॉलिग्राफ चाचणी या प्रयोगशाळेतील खालील अधिका-यांनी एकत्रितपणे केलेली आहे.

| अधिकारी | शिक्षण | पद | अनुभव |
|---|---|---|---|
| श्री.सन्नी जोसेफ | M.A. Psychology M.Phill | सहाय्यक रासायनिक विश्लेषक | दिड वर्ष |
| श्री.निलेश शिंदे | M.A. Psychology | सहाय्यक रासायनिक विश्लेषक | दिड वर्ष |
| कु.नवाज इरानी | M.A. Psychology | सहाय्यक रासायनिक विश्लेषक | दिड वर्ष |
| कु.दिप्ती पुराणिक | M.A. Psychology | सहाय्यक रासायनिक विश्लेषक | दिड वर्ष |

मुद्दा क्र.(५) व (६)

या प्रयोगशाळेच्या जा.क्र. M(T)-५२३७/०८ दि.०७.०३.२००८ अन्वये मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना या प्रकरणाचा अहवाल पाठवण्यात आलेला आहे. तो त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावा.

सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायदयाचे कलम ८(१) (ख) (छ) (ज) व (व) अन्वये मुद्दा क्रं. (५) व (६) ची माहिती राखून ठेवण्यात आलेली आहे.

जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.१२.२००७, दि.०२.०१.२००८ व दि.२९.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

१) या प्रकरणामध्ये नार्को चाचणी घेण्याकरिता पोलीस अधिका-यांनी न्यायालयाची परवानगी घेतली आहे. परंतू सदर प्रकरणी नार्को चाचणी घ्यावयाची किंवा नाही हे संबंधीत तज्ञ ठरवितात. संबंधीत तज्ञांना नार्को चाचणी घेण्याची आवश्यकता वाटत नसल्यामुळे ती घेण्यात आलेली नाही.

२) सदर प्रकरणातील केलेल्या चाचणीचा अहवाल तयार झालेला नाही. आरोपीच्या चाचण्याचा अहवाल चाचणीप्रमाणे बनविण्यात येईल व त्यानुसार संबंधीत पोलीस ठाण्याकडे पाठविण्यात येईल.

३) डी.एफ.एस. (Directorate of Forensic Science Ministry of Home affairs, Government of India) यांनी चाचणीच्या Manual मध्ये दिलेल्या Guidelines नुसार पॉलीग्राफ चाचणीची Video किंवा Audio Recording करणे सक्तीचे नाही. या प्रकरणी पॉलीग्राम चाचणीची Video किंवा Audio Recording करण्यात आलेली नाही.

४) पॉलीग्राम चाचणी करण्या-या अधिका-याचे नाव श्री.सन्नी जोसेफ आहे.

५) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे माहितीच्या अधिकारात सदर केलेल्या अर्जातील मुध्दा क्र.४ ते ९ या संबंधी दस्तऐवज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) अन्वये राखून ठेवण्यात येत आहे.

जबाबदारी टाळून चुकीची, दिशाभूल करणारी व व्यथीत करणारी माहिती दिली. कोणतीही सकारात्मक भूमिका घेतली नाही. प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही या करणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.०५.२००९, दि.०१.०६.२००९ व दि.०२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराचा मुलगा दत्तात्रय यांच्या खुनाबाबत कोतवाली पोलीस स्स्टेशन, अहमदनगर येथे गुन्हा दाखल केला होता. मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांनी आरोपीच्या नार्को चाचण्या घेण्याचे आदेश दिले. वैज्ञानिक प्रयोग शाळेतील तज्ञांनी नार्को चाचण्या घेतल्या नाहीत. या संदर्भात अपीलकाराने विविध मुद्याबाबत जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी वैज्ञानिक प्रयोग शाळा यांचेकडे माहितीच्या अधिकारात अर्ज / प्रथम अपील सादर करुन माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी उपलब्ध माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. पॉलीग्राफ ही मानसशास्त्रीय चाचणी घेउन लिखीत अहवाल संबंधीत पोलीस स्टेशनला पाठविल्याचे कळविले आहे. या प्रकरणामध्ये नार्कोचाचणी करण्याची आवश्यकता नसल्याचे तज्ञांचे मत आहे. त्याची Video किंवा Audio Recording केलेली नाही. पॉलीग्राफ टेस्ट ची Video किंवा Audio Recording करण्याची आवश्यकता नाही. पोलीसांनी आरोपीबाबतची दिलेली प्रश्नावली व इतर कागदपत्र संबंधीत पोलीस ठाणे कडून प्राप्त करावी. चाचण्या करणा-या अधिका-यांची नावे, शिक्षण व हुद्दा इत्यादी बाबतची माहिती अपीलकारास कळविण्यात आली. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे या प्रकरणांच्या अहवालाची प्रत व चाचण्यासंबंधीचे इतर कागदपत्र राखून ठेवण्यात आल्याचे अपीलकारास कळविले असल्याचे प्रथम

अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०५.२००९ रोजी आयोगास लेखी अहवाल सादर करुन कळविले आहे. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, अपीलकारास उपलब्ध माहिती पुरविली. आरोपींची नार्को टेस्ट करण्याबाबत मा.न्यायालयाचे आदेश असूनही वैज्ञानिक प्रयोगशाळेने आरोपीची नार्कोटेस्ट केली नाही. आरोपीची नार्कोटेस्ट करण्याबाबत मा.न्यायालयाचे आदेश असूनही नार्कोटेस्ट न करण्याचा स्वेच्छधिकार संबंधीत अधिका-यांना आहे का? याबाबतची माहिती पुरवावी असा सुनावणीच्यावेळी अपीलकाराने आग्रह धरला होता. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार, अपीलकाराने मागीतलेली माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देणेबाबत खात्री करण्यात येते. सदर प्रकरणी वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या अधिका-यांनी मा.न्यायालयाचे आदेश असतांना नार्कोटेस्ट का केली नाही, नार्कोटेस्ट न करण्याचा त्यांना स्वेच्छाधिकार आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे देण्याची बाब माहितीच्या अधिकारात येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०७.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

 FILENAME \p C:\Documents and Settings\abc\My Documents\Mr.R.Tiwari\Orders\Marathi 2009\Marathi July, 2009.doc Kamlesh